www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी
# युवक आधार

मुख्य संपादक - भारती संतोष आमले   उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे   निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील   सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २   अंक : 322   बुधवार दि. 06 ऑगस्ट २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : 6   RNI MAHMAR/2023/89514




## ओरिएंटल कंन्टेनर्स लि. मुरबाडच्या कामगारांना नऊ हजार सहाशे पन्नास रुपयांची वेतनवाढ.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी.गौरव खरे.मुरबाड**




मुरबाड : येथील मे. ओरिएंटल कन्टेंनर्स लि.कंपनीतील कामगारांना ९६५० रुपयांची वेतनवाढ मिळाली आहे. सिटू संलग्न महाराष्ट्र इंजिनियरींग उद्योग कामगार संघटना व ओरिएंटल व्यवस्थापनाच्या प्रतिनिधींनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी कामगारांना तीन वर्षासाठी रुपये ९ हजार सहाशे पन्नास रुपये वेतनवाढ करार करण्यात आला. पहिल्या वर्षी ६0टक्के, दुसऱ्या वर्षी20

टक्के व तिसऱ्या वर्षी२० टक्के याप्रमाणे ही वाढ मिळणार आहे. तसेच कामगार आणि त्यांच्या परिवारासाठी 2 लाखाची मेडिकल पॉलिसी काढण्यात येणार आहे. याचबरोबर बोनस,प्रवास भत्ता,रजांसहीत या करारापोटी कामगारांना 2 महिन्यांचा एरियस देखील मिळणार आहे. सिटु सभासद सर्व कामगारांना या कराराचा लाभ मिळणार आहे.यामुळे कामगारांत समाधान व्यक्त होत आहे. वेतनवाढीच्या करारावर सिटूचे राज्य अध्यक्ष डॉ. डी. एल. कराड, सेक्रेटरी -राज्य कमिटी सदस्य विजय विशे, तालुका अध्यक्ष दिलीप कराळे,सरचिटणीस अशोक विशे, युनियन कमिटी मेबंर शिवाजी तुपे, सुरेश कडव, संतोष शिर्के, परेश घुडे, शिवाजी महाजन,मधुकर टोहके, नरेश पष्टे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. याप्रसंगी कंपनीचे एच.आर. संजय बामणे साहेब, युनियनचे उपाध्यक्ष सिताराम ठोंबरे ,देवीदास आडोळे ,खजिनदार संतोष काकडे,मुरबाड तालुका जनरल सेक्रेटरी सागर भावार्थे हे उपस्थित होते.

## "पुढील २४ तासांत", डोनाल्ड ट्रम्प यांची भारताला पुन्हा धमकी ?

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणांची जगात चर्चा सुरू आहे. काही दिवसांपूर्वी ट्रम्प यांनी भारतावर देखील २५ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली. एवढंच नाही तर भारताकडून दंड वसूल करण्याचाही इशारा ट्रम्प यांनी दिला. भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी करत असल्याच्या मुद्यांवरून डोनाल्ड ट्रम्प हे आक्रमक होत आहेत. यावरून ट्रम्प सातत्याने भारतावर आयात शुल्क (टॅरिफ) लादण्याची धमकी देत आहेत. दरम्यान, आता ट्रम्प यांनी भारताला पुन्हा एकदा धमकी देत टॅरिफमध्ये आणखी मोठी वाढ करण्याचा इशारा दिला आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी करण्याच्या मुद्यांवरून ट्रम्प हे भारतावर टीका करत आहेत. आज पुन्हा याच मुद्यांवरून ट्रम्प यांनी भारतावर घणाघाती टीका केली आहे. तसेच पुढील



२४ तासांत भारतावर पुन्हा अतिरिक्त कर लादण्याचा इशारा एका मुलाखतीत बोलताना दिला आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

**डोनाल्ड ट्रम्प यांनी काय म्हटलं?**

"भारत हा एक चांगला व्यापारी भागीदार नाही. भारत आमच्याबरोबर व्यापार करतो. मात्र, अमेरिका भारताबरोबर व्यापार करत नाही. भारतावर २५ टक्के टॅरिफ लादण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, आता मला वाटतं की, पुढील २४ तासांत भारतावर आणखी जास्त टॅरिफ आकारावं. कारण भारत रशियाकडून तेल खरेदी करत आहे, म्हणजेच युद्ध यंत्रणेला इंधन देत आहे", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

ट्रम्प सातत्याने भारताला अतिरिक्त टॅरिफ लागू करण्याची धमकी देत आहेत. काही दिवसांपूर्वीच भारतावर २५ टक्के टॅरिफ आणि अतिरिक्त दंड आकारला जाईल, असं ट्रम्प यांनी जाहीर केलं होतं. सोमवारी संध्याकाळी केलेल्या सोशल पोस्टमध्ये रशियाकडून भारत तेल खरेदी करतो म्हणून आणखी टॅरिफ आकारले जाईल, अशी नवी धमकी ट्रम्प यांनी दिली होती. त्यानंतर भारत सरकारने रशियाचंच उदाहरण देत ट्रम्प यांना प्रत्युत्तर दिलं होतं. ज्या रशियाचं नाव घेऊन डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला धमकावलं आहे, त्याच रशियाकडून अमेरिका व युरोपियन युनियन कच्चा माल आयात करत असल्याचा दाखला भारतानं दिला आहे. यासंदर्भात परराष्ट्र मंत्रालयाकडून सोमवारी संध्याकाळी उशीरा निवेदन जारी करण्यात आलं होतं. परराष्ट्र खात्याचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी आपल्या अधिकृत एक्स हँडलवरून हे निवेदन शेअर केलं होतं. "युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून अमेरिका व युरोपियन राष्ट्रे रशियाकडून तेल आयात करतो म्हणून भारतावर सातत्याने टीका करत आहेत. पण युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून तेलाचे उपलब्ध पुरवठा पर्याय हे युरोपकडे वळवण्यात आले. त्यामुळेच भारतानं रशियाकडून तेल आयात करायला सुरुवात केली. त्यावेळी जागतिक स्तरावरील ऊर्जा बाजारपेठेतील समतोल टिकवण्यासाठी अशा प्रकारची आयात करण्यास अमेरिकेने भारताला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिलं होतं", असं भारताने निवेदनात म्हटलं होतं.

## वाशिम शेती शिल्प'चे चीया बियाणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेट.

### जिल्हाधिकारी भुवनेश्वरी यांचा स्तुत उपक्रम शेतकऱ्यांसाठी नवा आत्मविश्वास.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**



**वाशिम** :- जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मेहनतीचे आणि महत्त्वपूर्ण आणि गुणवत्ता पूर्ण उत्पादनाचे प्रतीक ठरलेल्या वाशिम शेती शिल्प या स्थानिक कृषी ब्रँडखाली उत्पादित च्या बियाण्याचे नमुने आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेट स्वरूपात सादर करण्यात आले जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस. यांनी हा उपक्रम हाती घेत शेतकऱ्यांचे उत्पादने राज्यस्तरावर पोहोचण्याची दिशा दाखवली आहे. जिल्हा कृषीप्रधान असून इथल्या शेतकऱ्याने विशिष्ट पीक उत्पादनामध्ये आपली विशिष्ट ओळख निर्माण केली आहे जिल्ह्यातील दर्जेदार शेतमालाला एक विशिष्ट ओळख देण्यासाठी वाशिम शेतीतील हा ब्रँड विकसित करण्यात आला आहे. या अंतर्गत उत्पादित होणारी च्या बियाणे ही एक पोषण मूल्यांनी समृद्ध आणि बाजारात मागणी असलेली नगदी पीक मानले जाते. या भेटीद्वारे ना केवळ वाशिमच्या कृषी उत्पादनांना मान्यता मिळाली तर शेतकऱ्यांच्या परिश्रमालाही शासन पातळीवर गौरव मिळाला आहे. जिल्हाधिकारी यांनी मुख्यमंत्र्यापुढे हा उपक्रम मांडताना सांगितले की शेतकऱ्यांचे उत्पादन हे दर्जेदार असून योग्य मार्केटिंग आणि शासनाची साथ मिळाल्यास त्यांचा आर्थिक स्तर उंचावल येईल. वाशिम शेती शिल्प या ब्रँड अंतर्गत पुढील काळात इतरही उत्पादनांना स्थानिक ओळख देत सस्टेनेबल मार्केट साखळी निर्माण केली जाणार आहे. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील तरुण शेतकऱ्यांमध्येही नव्या प्रेरणेला चालना मिळेल. असा विश्वास व्यक्त केला जात आहे. मुख्यमंत्र्यांनीही जिल्हाधिकाऱ्याच्या या उपक्रमाचे कौतुक करत स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

## मनसेचा दणका! खतटंचाईवरून प्रशासनाला झटका; जिल्हाधिकाऱ्यांकडून तात्काळ आदेश, कृषी अधिकाऱ्यांना उघड वॉर्निंग

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

अलिबाग तालुक्यातील पोयनाड परिसरातील शेतकऱ्यांवर कृत्रिम खतटंचाईचं मोठं संकट कोसळलं असताना, संबंधित विभाग मात्र गाढ झोपेत होता. पण महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या रोखठोक आंदोलनामुळे अखेर प्रशासनाची झोप उडाली.दि. ४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी मनसे शॅडो कॅबिनेटचे सदस्य देवव्रत विष्णू पाटील, अलिबाग तालुका अध्यक्ष सिद्धू म्हात्रे, जिल्हा ग्राहक परिषद सदस्य गोरखनाथ पाटील, यांनी थेट निवासी जिल्हाधिकारी संदेश शिर्के यांची भेट घेतली.बैठकीत त्यांनी प्रशासनाच्या निष्काळजी कारभारावर खरमरीत शब्दांत नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांना अडवून ठेवणाऱ्या खत विक्रेत्यांविरोधात कारवाईची जोरदार मागणी करण्यात आली. "खतासारख्या अत्यावश्यक वस्तूवर कोणी दुकानदार मक्तेदारी करतोय, हे सरकारच्या व्यवस्थेचं अपयश आहे," असा घणाघात मनसे पदाधिकाऱ्यांनी केला.

जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ प्रतिक्रिया देत जिल्हा कृषी अधिकारी शिंदे मॅडम यांना फोन करून थेट आदेश दिले – "तातडीने कार्यवाही करा, अन्यथा जबाबदारी ठेवल्या जाईल."यानंतर मनसे शिष्टमंडळाने थेट कृषी विभागाच्या कार्यालयात जाऊन शिंदे मॅडम यांची भेट घेतली आणि स्पष्ट शब्दांत सांगितले "शेतकऱ्यांची अडवणूक खपवून घेतली जाणार नाही. खत मिळालंच पाहिजे!"या भेटीनंतर प्रशासन हललं आणि अखेर जिल्हा पातळीवर तात्काळ उपाययोजना सुरू झाल्या. संबंधित खत विक्रेत्यांवर नजर ठेवण्याचे आदेश देण्यात आले. काही ठिकाणी दुकानदारांवर मौखिक कारवाईही करण्यात आली.मनसेच्या ठाम आणि राणाटकी भूमिकेमुळे प्रशासन हादरले असून, ही घटना एक जाग आणणारी ठरली आहे. राजकारण हे केवळ निवडणुकांचं नसून लोकहितासाठी लढण्याचं माध्यम आहे, हे मनसेने पुन्हा एकदा दाखवून दिलं आहे.



*"बुद्धभूषण मुनेश्वर (जिल्हा गुणवत्ता नियंत्रक अधिकारी) यांचा इशारा: "सर्व शेतकऱ्यांना खत मिळेल. कोणत्याही दुकानदाराची अरेरावी खपवून घेतली जाणार नाही. खत ही अत्यावश्यक वस्तू असून कोणीही ते आडवू शकत नाही. कोणी अडवणूक केल्यास कृषी विभाग कठोर कारवाई करेल आणि खत थेट शेतकऱ्यांपर्यंत पोचवेल."

**बुद्धभूषण मुनेश्वर**
**जिल्हा गुणवत्ता नियंत्रक अधिकारी**

## मोहदरी येथे नव्याने रुजू झालेले ग्रामविकास अधिकारी यांचा युवकांच्या वतीने सत्कार*

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड**



ग्रामसेवक हा गावाचा आधारस्तंभ असतो ते केवळ शासकीय कर्मचारी नसून एक दूरदृष्टी असलेले विकासदूत असतात. त्याच्या कार्यक्षमतेवर संपूर्ण गावाचा विकास अवलंबून असतो. अशा या ग्रामसेवकांची भूमिका ओळखून त्यांना योग्य सन्मान आणि सहकार्य देणे ही ग्रामस्थांची जबाबदारी असते ग्रामविकासाच्या प्रत्येक टप्प्यावर ग्रामसेवकांची भूमिका अत्यंत महत्वाची असते. योजनाची अमलबजावणी, गावातील समस्या सोडवने, नोंदी ठेवणे, जनतेशी संपर्क ठेवणे, ग्रामसभा आयोजित करणे, स्वछता अभियान राबवणे, जलसंधारण योजना, रस्ते नळपाणी योजना आणि अजून किती तरी विकास कामे ग्रामसेवकांच्या माध्यमातून केले जातात त्या उद्देशाने नव्याने मोहदरी येथे रुजू झालेले ग्रामसेवक श्री दत्ता कांबळे यांचा युवकांच्या माध्यमातून सत्कार करण्यात आला हा सत्कार त्यांनी पुढील कामे अधिक जोमाने करावे त्यांना चांगले काम करण्यास प्रेरणा मिळावी साठी करण्यात आला होता यावेळी राजु गायकवाड, ऋषिकेश डाखोरे, शिलानंद धुळे,बालाजी कोळेकर, सुदाम दांडेगावकर, गजानन चव्हाण, राम पोटे, किसन मोरे आदी उपस्थित होते.

## श्रीवर्धन पोलिसांची धडाकेबाज कारवाई, गुटखा विक्री करणाऱ्याच्या आवळल्या मुसक्या..

दैनिक युवक आधार
श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित

आज रोजी पोलीस निरीक्षक उमेश पाटील श्रीवर्धन पोलीस ठाणे यांना, गोपनीय बातमीदारा मार्फत, खबर मिळाली की एक इसम श्रीवर्धन शहरात बुडन पखाडी परिसरात, प्रतिबंधित असलेला गुटखा विक्रीसाठी घेऊन आलेला आहे, सदर मिळालेल्या माहितीनुसार पोलीस निरीक्षक उमेश पाटील, API लकडे, PSI संदीप पाटील व पथक यांनी बुडन पखाडी परिसरात मिळालेल्या माहितीनुसार सापळा रचला असता एक इसम एका घराचे कंपाउंड मध्ये मोकळ्या जागी एका सिल्वर रंगाचे कार जवळ उभा असलेला दिसला, बातमीची खात्री होताच पोलिसांनी सदर इसमाकडे कसून चौकशी करून त्याचे मारुती टाटा इंडिका विस्टा कार क्रमांक MH -02- DJ- 2784 या कारची तपासणी केली असता कार मध्ये विमल कंपनीच्या प्रतिबंधित गुटख्याच्या एकूण ०६ बॅग सापडल्या त्याची अंदाजे किंमत ८७१२०/-



रुपये आहे... सदर इसमास ताब्यात घेतले असून श्रीवर्धन पोलीस पुढील कायदेशीर कारवाई करीत आहेत.

## माजी आ.भीमरावजी धोंडे यांचा विविध सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा,

### शुभेच्छा देण्यासाठी हितचिंतक, कार्यकर्त्यांची अलोट गर्दी

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधः मारुती सत्रे**

आष्टी ,पाटोदा, शिरूर विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार तथा आंनद चॅरिटेबल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षणमहर्षी, लोकनेते आ.भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित मंगळवारी दि. ५ ऑगस्ट रोजी आष्टी तालुक्यात विविध ठिकाणी सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्यात आला आ. भिमराव धोंडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी आ. भिमराव धोंडे यांच्या आष्टी येथील निवासस्थानी सकाळी ८ वाजल्यापासून कार्यकर्ते हितचिंतकांनी शुभेच्छा देण्यासाठी गर्दी केली होती.आष्टी शहरातील मोरेश्वर मंगल कार्यालयात अभिष्टचिंतन सोहळा व कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.संघर्षमय नेत्याला उदंड आयुष्य लाभो अशा शुभेच्छा देण्यात आल्या यावेळीआष्टी-पाटोदा-शिरुर मतदार संघातील विविध पक्षांसह सामाजिक कार्यकर्ते, हितचिंतकांनी गर्दी केली होती. आष्टी-पाटोदा -शिरूर तालुक्यात विविध ठिकाणी फळ वाटप, रक्तदान शिबीर, साहेब चषक क्रिकेट स्पर्धा,तसेच रूग्णालयात फळ वाटप, तसेच विविध शाळेत व महाविद्यालयात वृक्षारोपण, रांगोळी स्पर्धा,निंबध स्पर्धा, पोस्टर प्रदर्शन, लिंबु चमचा, धावणे स्पर्धा, कबड्डी स्पर्धा , क्रिकेट स्पर्धा , असे अनेक विविध सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्यात आला. तसेच आंनद शैक्षणिक संकुल गंगाईनगरामधील सर्व विद्यालय व महाविद्यालये यांच्या संयुक्त रक्तदान शिबिरात मोठ्या प्रमाणावर दात्यांनी रक्तदान केले ठिकठिकाणी शाळेत विविध स्पर्धांचे आयोजन केले होते.तर माजी आ.भिमराव धोंडे यांना सामाजिक, राजकीय,शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून सत्कार केला तर काही मान्यवरांनी फोन वरुन, सोशल मीडिया वरून तसेच आष्टी येथील निवासस्थानी उपस्थित राहुन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.अभिष्टचिंतन व कार्यकर्ता मेळावा प्रसंगी युवा नेते अजय दादा धोंडे, अभय राजे धोंडे,रामराव खेडकर,ॲड. रत्नदिप निकाळजे,भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, अशोक साळवे,लालाभाऊ कुमकर,पांडुरंग नागरगोजे,सभापती सुवर्णाताई लांबरुड, पांडुरंग गावडे,सुदाम झिंजुर्के,




संभाजी दहातोंडे, मधुकर जायभाय,उद्धव राठे,भागवत खरमाटे,सावळेराम जायभाय ,वैभव बडे,सरपंच दादा जगताप,औटे, राजपाल शेंडगे, देविदास शेंडगे,महारुद्र खेडकर,माऊली पाणसंबळ,बप्पा भिलारे, भाऊसाहेब धनवडे, संतोष सानप, विष्णू गायकवाड, बाबासाहेब गरकळ, अंकुश मुंडे,बंडु कराड, भाऊसाहेब धनवडे,स्वामी खेडकर,सुशिल कोळेकर, इंदुबाई गोल्हार,बाळासाहेब भुकन, सतिश झगडे, अस्लम बेग,संजय नालकोल, प्रशासकीय अधिकारी डी.बी.राऊत,डॉ.शिवदास विधाते,माऊली बोडखे, संजय शेंडे, राजकीय सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्यंकट हेरिटेज कॉम्प्लेक्स मधुरम सह.गृह.संस्था मर्या.ही सोसायटी धोकादायक,

### सोसायटी कमिटीच्या निष्क्रिय कारभाराबद्दल रहिवाशांची नाराजी

**पनवेल/आण्णासाहेब आहेर**

न्यू पनवेल पासून जवळच असलेल्या टेंभोडे येथील व्यंकट हेरिटेज कॉम्प्लेक्स मधुरम सह.गृह.संस्था मर्या.ही सोसायटी धोकादायक असल्याचे महापालिकेने घोषित केल्यामुळे व उच्च न्यायालयाच्या दिलेले आदेशानुसार पाच ऑगस्ट रोजी रहिवाशांनी खाली करण्याचा निर्णय घेतला असून, सोसायटीच्या गैरकारभार व चुकीच्या व्यवस्थापन प्रक्रियेमुळे रहिवासी संकटात आले असल्याचे पाच ऑगस्ट रोजी रोजी रहिवाशांनी सांगितले कोरोना काळात प्रत्येकी १ बीएचके दीड लाख व २ बीएचके ला १.६० अशी रक्कम रहिवाशांकडून सोसायटी कमिटीने डागडुजी साठी रक्कम घेतली त्याच्या रहिवाशांनी सांगितले आता सोसायटी धोकादायक जाहीर केली व दहा वर्षे आपली सोसायटी तुटणार नाही असे अध्यक्ष मार्फत रहिवाशांना सांगितले जायचे त्यामुळे रूममधील अंतर्गत मेजर रिपेरिंग प्रत्येकानी स्वखर्चाने केले आहे तोही खर्च रहिवाशांचा झाला आहे मात्र सोसायटी व विकासाकडून कुठलेही लेखी अग्रीमेंट किंवा भाडे चालू करण्याबाबत सोसायटीकडून व कमिटीच्या विचाराधीन विकासकांकडून रहिवाशी यांना दिले नाही सदर सोसायटी कमिटीने



आर्थिक अपहार केल्याचे रहिवाशांचे म्हणणे असून त्याबाबत कायदेशीर लढा लढण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे न्यायालयाने दिलेली पाच ऑगस्ट,२००२५ ही शेवटची तारीख बहुतांशी सदस्यांनी रूम खाली केल्या असून न्यायालयाच्या निर्णयाचा मान राखला आहे,दुसरीकडे जाताना तेथील भाडे कसे भरायचे हा प्रश्न रहिवाशांना पडला आहे, नवीन पुनर्वसन कशा प्रकारचे होईल कधी होईल? कुठल्या सुविधा अंतर्गत होईल?याबाबत कुठलीही कल्पना रहिवाशांना नाही, भाडे रुपी आर्थिक बोजा रहिवाशावर पडणार आहे तर सोसायटीच्या निष्क्रिय कारभारामुळे ही परिस्थिती रहिवाशांवर आली असून मागील भ्रष्टाचार लपवण्यासाठी व लाभापोटी बिल्डिंग तोडण्याचा घाट घातला गेला असून यामुळे रहिवाशांचे खूप मोठे नुकसान होणार आहे सदर प्रकाराबाबत सोसायटीच्या कमिटीला व कारभाराला न्याय प्रक्रियेच्या माध्यमातून जाब विचारला जाईल असा निर्धार व्यक्त करत माहिती अधिकार व प्रशासनाच्या माध्यमातून चौकशी व्हावी मागणी केली असता अजून चौकशी केली नसून ती व्हावी यासाठी उच्चस्तरीय चौकशी अन्वये व न्यायालयीन प्रक्रियेच्या माध्यमातून सोसायटी कमिटीचा आर्थिक भ्रष्टाचार पुढे आणण्याचा मानस सुजित चौधरी यांच्यासह रहिवाशांनी व्यक्त केला आहे.

# पेट्रोल पंपाबरोबरच सीएनजी युनिटच्या सेवेत देखील यशस्वी होतील

## उद्योजक उदय लोध यांनी प्रशांत यादव यांच्यावर दाखवला विश्वास

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार चिपळूण (प्रतिनिधी)**
: पेट्रोल व सीएनजी व्यवसायात सेवा ही सतत द्यायला पाहिजे तरच ग्राहक आपल्याकडे येतो. पेट्रोल पंप असोसिएशनमध्ये स्वामिनी पेट्रोल पंपाचे संचालक प्रशांत यादव नव्याने दाखल होऊनदेखील आदर्श व्यवसाय कसा करावा, हे त्यांनी सिद्ध केले आहे. इथले ग्राहक व नागरिकांकडून चांगल्या कामाची पोचपावती मिळाली आहे. तर आता पेट्रोल पंपाच्या सेवेत सीएनजीची भर पडली आहे. ते या व्यवसायात देखील यशस्वी होतील, असा विश्वास कन्सोर्टीयम ऑफ इंडियन पेट्रोलियम डीलर्स चे अध्यक्ष उदय लोध यांनी कामथे येथे स्वामिनी सीएनजी युनिटच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केला.

कामथे येथे स्वामिनी पेट्रोलियम सीएनजी युनिटचे उद्घाटन चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुभाषराव चव्हाण, कन्सोर्टीयम ऑफ इंडियन पेट्रोलियम डीलर्सचे अध्यक्ष उदय लोध यांच्या हस्ते फीत तर मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून झाले.

यावेळी व्यासपीठावर चिपळूण नागरीचे संस्थापक चेअरमन सुभाषराव चव्हाण, उद्योजक उदय लोध, माजी आमदार रमेश कदम, चिपळूण नागरीच्या संचालिका सौ. स्मिता चव्हाण, माजी जिल्हा परिषद सदस्य विनोद झगडे, सुधीरकाका भागवत, बंड्या बोरूकर, छोट्या गवाणकर, महानगर गॅसचे अजित शिंदे, शिवसेना उबाठाचे युवासेना तालुका अधिकारी उमेश खताते, दळवटणेचे माजी सरपंच सचिन शेट्ये, काँग्रेसचे चिपळूण तालुकाध्यक्ष लियाकत शाह आदी उपस्थित होते.

यावेळी ते पुढे म्हणाले की, सीएनजी म्हटले की, वाहनांच्या रांगा, असे एक चित्र आपण पाहत आहोत. पेट्रोल, डिझेलला पर्याय म्हणून सीएनजी इंधन आले आहे. तसेच इलेक्ट्रिकल वाहने आली आहेत. पेट्रोल- डिझेलमध्ये बदलते स्वरूप पाहता बदलत्या व्यापाराचे लक्षण आहे. त्याच्यामध्ये सीएनजीचा अंतर्भाव होतो. पेट्रोल पंपांना काम राहणार नाही. मात्र, सीएनजी युनिट टिकतील. सीएनजी इंधन इको फ्रेंडली असून प्रदूषण कमी होते. सीएनजी पंपासमोर ग्राहकांच्या वाढलेल्या मागणीमुळे वाहनांच्या रांगा दिसतात. परंतु, आता महानगर गॅस कंपनीकडून रत्नागिरी जिल्ह्यात वेळेत सीएनजीचा पुरवठा व्हावा, यासाठी पावले उचलली जात आहेत. यामुळे सीएनजी युनिट समोर वाहनांच्या रांगा लागणार नाहीत, असे लोध यांनी यावेळी स्पष्ट केले.

चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुभाषराव चव्हाण यांनी आपल्या मनोगतात वाशिष्ठी डेअरीचे चेअरमन प्रशांत यादव यांनी वाशिष्ठी डेअरी प्रकल्पाच्या माध्यमातून रोजगाराची संधी निर्माण





केली आहे. तसेच स्वामिनी पेट्रोल पंपाला आता सीएनजी युनिटची जोड दिली असून वाहनधारकांसाठी सेवेचे व्रत स्वीकारलेले दिसत आहे. या प्रकल्पांमुळे तरुणांना रोजगार देण्यासाठी झटत असल्याचे स्पष्ट होत आहे. तर तुम्हां सर्वांची प्रशांत यादव यांना सामाजिक, राजकीय, व्यवसाय क्षेत्रात भक्कम साथ मिळते आहे, याचे आम्हाला समाधान असून भविष्यात असाच पाठींबा राहू दे, अशी अपेक्षा सुभाषराव चव्हाण यांनी यावेळी शेवटी व्यक्त केली.

वाशिष्ठी डेअरीचे चेअरमन तथा स्वामिनी पेट्रोल पंपाचे संचालक प्रशांत यादव यांनी पेट्रोल व्यवसायातील वाटचालीची माहिती देतांना आता सीएनजी इंधन पुरवठा क्षेत्रात पाऊल टाकलेले आहे. तत्पूर्वी सामाजिक, राजकीय, व्यवसायिक क्षेत्रात जी प्रगती दिसते आहे. ती आपल्या सर्व मंडळींचा हातभार, ज्येष्ठांचे आशीर्वादामुळे दिसते आहे. आपल्या इथे सीएनजी युनिट सुरू करण्यासाठी महानगर गॅस प्रकल्पाने मोठे सहकार्य केले आहे. सीएनजी वाहनधारकांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याबरोबरच बाजूच्या प्लॉटमध्ये रेस्टॉरंट सुरू करण्याचा आपला मानस असल्याचे यादव यांनी यावेळी स्पष्ट केले.

रत्नागिरी महानगर गॅसचे प्रोजेक्ट मॅनेजर अजित शिंदे यांनी सीएनजी युनिट म्हणजे केवळ एक इंधनाचा स्त्रोत नाही तर आपल्या गावाच्या विकासासाठी एक पायरी आहे. इथल्या लोकांना रोजगार मिळणार आहे. सीएनजी इंधनासाठी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात मात्र ही गैरसोय दूर व्हावी यासाठी महानगर गॅसने नवनवीन युनिट सुरू करण्याचे उद्दिष्ट बाळगले आहे. यानुसार स्वामिनी पेट्रोलियम सीएनजी युनिटचा शुभारंभ होत आहे. या युनिटला आपण सर्वांनी पाठिंबा द्यावा, असे आवाहन शिंदे यांनी यावेळी केले.

माजी आमदार रमेश कदम, चिपळूण अर्बन बँकेचे चेअरमन मोहन मिरगल, माजी नगरसेवक शिरीष काटकर, माजी जिल्हा परिषद सदस्य विनोद झगडे, देवरुखमधील बंड्या बोरूकर, आदींनी आपल्या मनोगतात वाशिष्ठी डेअरीचे चेअरमन तथा स्वामिनी पेट्रोल पंपाचे संचालक प्रशांत यादव यांच्या व्यवसायिक क्षेत्रातील यशस्वी वाटचालीचे भरभरून कौतुक करीत सीएनजीच्या नव्या युनिटच्या शुभारंभाबद्दल शुभेच्छा दिल्या.

*उद्योजक प्रशांत यादव व सौ. स्वप्ना यादव यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव!*

स्वामिनी पेट्रोलियम सीएनजी युनिटच्या शुभारंभ प्रसंगी मान्यवरांनी उपस्थित राहून या पंपाचे संचालक प्रशांत यादव व संचालिका यादव यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. यामध्ये शिवसेना उबाठा नेते गुहागर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भास्करराव जाधव, उत्तर रत्नागिरीच्या जिल्हाध्यक्ष सौ. सोनललक्ष्मी घाग,भाजपा उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्ष सतिष मोरे,माजी जिल्हा परिषद सदस्य बाळकृष्ण जाधव, शिवसेना उबाठा विधानसभा क्षेत्र प्रमुख बाळा कदम, चिपळूण तालुकाप्रमुख बळीराम गुजर, चिपळूण संगमेश्वर समन्वयक राजू देवळेकर, चिपळूण नागरी चे व्हाईस चेअरमन अशोक साबळे, संचालक अशोक कदम, सोमा गुडेकर, गुलाब सुर्वे, रवींद्र भोसले, सत्यवान मामुनकर, राजेंद्र पटवर्धन, गणेश खेतले, महादेव खेतले, चिपळूण अर्बन बँकेचे संचालक मिलिंद कापडी, निहार गुढेकर, माजी संचालक सतीश खेडेकर, रामचंद्र हरेकर, संतोष होडे, मिलिंद तेटाबे, प्रसाद लाड, सौ. अंजली कदम, सौ. सुप्रिया उतेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य ऐश्वर्या घोसाळकर, माजी नगराध्यक्षा सावित्री होमकळस,माजी नगरसेविका सौ. सीमा चाळके, माजी नगरसेवक रतन पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य संतोष थेराडे, वासुदेव मेस्त्री, संदीप साळवी, शमून घारे, राकेश दाते, फैसल पिलपिले, गुलजार कुरवले, मंगेश माटे, हरी कासार, तात्या कासार, संकेत शिंदे, अभिनव भुरण, इम्तियाज कडू, श्रीनाथ खेडेकर, रोहन चौधरी, शिवसेना उबाठा माजी तालुकाप्रमुख सुधीर शिंदे, सुधीर चव्हाण, प्रकाश साळवी, सुकांत यादव, वृषाली यादव, अजित गुजर, कैसर देसाई, महेश महाडिक, विश्वास कदम, नथुराम रेडीज, संजय पेडणेकर, छोट्या गवाणकर, तेजस शिंदे, बावा चव्हाण, अक्षय केदारी,शिवसेना महिला शहर संघटक वैशाली शिंदे,स्वाती देवळेकर,रहीमत जबले, अंजली कदम,रुही खेडेकर,राधा शिंदे,माजी सभापती धनश्री शिंदे,माजी नगरसेवक इनायत मुकादम, आसिफ मुकादम, विनोद सुर्वे, माजी उपनगराध्यक्ष सुधीर शिंदे, माजी नगरसेवक परिमल भोसले, समीर खामकर, मुन्ना थरवळ, कैसर देसाई, विजय कुवळेकर,इसतीयक कापडी,तेजस शिंदे,युवक जिल्हाध्यक्ष नौसीन काझी,संतोष सावंतदेसाई, निलेश भुवड, बाळू शिंदे, विनोद भोबसकर आदीनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल टाकळे यांनी केले. तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वामिनी पेट्रोल पंपाच्या संचालक प्रशांत यादव व संचालिका सौ. स्वप्ना यादव यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी वर्गाने मेहनत घेतली.

## मा.जिल्हा आरोग्य अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांच्या प्रेरणेतून आरोग्य कर्मचारी केली अवयवदानाची नोंदणी.

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी रणजितसिह. ठाकूर**
श्री भारत पारवे सिकलसेल सहाय्यक आणि उपकेंद्र लेहणी येथील शुभम चौधरी आरोग्य सेवक यांनी एक महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायक निर्णय घेतला आहे. त्यांनी माननीय मां . डॉ.प्रेमकुमार ठोंबरे सर जिल्हा आरोग्य अधिकारी वाशिम व मा.रामहरी बेले सर जिल्हा हिवताप अधिकारी वाशिम तथा तालुका आरोग्य अधिकारी रिसोड यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने अ व य व दा न करण्यासाठी ऑनलाईन नोंदणी केली आहे.



Ministry of Health & Family Welfare
Government of India
ORGAN DONATION
PLEDGE CERTIFICATE
Bharat laxman parve
I, hereby unequivocally authorise the removal of the mentioned Organ(s) and /or Tissue(s) from my body for therapeutic purpose after being declared (BrainStem/ Cardiac) dead by the board of medical experts.
Father's/Husband's Name: Laxman
ABHA Number: 45-0281-5645-4405
Blood Group: B+
NOTTO ID: D254977108256
Emergency Contact Number: 9049173773
Organs: Liver, Kidney, Heart, Lungs, Intestine, Pancreas
Tissues: Bone, Heart Valve, Skin, Cornea, Cartilage, Blood Vessels
Other organs and tissues
Date of Issuance: 02 Aug 2025
An opportunity to live after life
notto.mohfw.gov.in | Email: dir@notto.nic.in | Toll Free Helpline (24 x 7) : 1800114770
National Health Authority

हा निर्णय समाजातील इतर लोकांनाही अवयवदानासाठी प्रेरित करेल. अवयवदान हे गरजू व्यक्तीला नवीन जीवन देऊ शकते. या आरोग्य सेवकांनी सामाजिक बांधिलकीची एक नवीन मिसाल कायम केली आहे.या उदात्त निर्णयाबद्दल मां.जिल्हा आरोग्य अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. अशा प्रकारच्या पुढाकारामुळे अवयवदानाची चळवळ अधिक गतिमान होईल. आरोग्यसेवक व सिकलसेल सहाय्यक हे केवळ लोकांच्या आरोग्याची काळजीच घेत नाहीत, तर त्यांच्या मृत्यूनंतरही ते समाजासाठी उपयुक्त ठरत आहेत.

## स्वयम मधून आत्मनिर्भर महिला उद्योजिका उभ्या ठाकतील!

### कन्साई नेरोलॅक पेन्टस लि.चे सामाजिक उत्तरदायित्त्व

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार चिपळूण (प्रतिनिधी)**
:-- कन्साई नेरोलॅक पेंटस लि. या कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्त्वातून व उपक्रम अंमलबजावणी संस्था दिशान्तर यांच्या विद्यमाने ग्रामीण महिला उद्योजकता विकास कार्यक्रम हाती घेण्यात आला असून त्यासाठी स्वयम कार्यशाळेचं एकदिवशीय पहिलं सत्र पार पडलं. व्यवसायाला एक नवा आयाम देणाऱ्या या कार्यशाळेची सात विविध सत्र असणार असून यातून व्यवसाय-उद्योगाचे मंत्र, तंत्र आणि समयोचित यंत्र देण्यात येणार असल्याने या कार्यशाळेचे महत्व अधोरेखित झाले आहे.

दिशान्तर संस्था गत दोन दशकापासून ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, उपजिविका, वस्ती विकास, जलव्यवस्थापन असे उपक्रम राबवित आहे. महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांपैकी आणखीन एक आर्थिक स्वावलंबनाचा आणि आत्मनिर्भरतेचा दिशा दाखविणारा टप्पा म्हणून स्वयम कार्यशाळेकडे पाहिले जात आहे. सात कार्यशाळांमध्ये डिजिटल मार्केटिंग, ई-कॉमर्स, कम्युनिकेशन स्किल्स, ब्रँडिंग, सोशल मिडिया वापर आणि व्यवसायासाठी आवश्यक इतर महत्त्वाचे कौशल्य विषय हे शिकवले जाणार असल्याचे दिशान्तर सचिव सीमा यादव यांनी सांगितले. या कार्यक्रमाला कन्साई नेरोलॅक पेन्टस लि. चे श्री. देशमुख यांच्या समवेत वर्क्स मॅनेजर लोटे प्लांटचे श्री. जयवर्धन, मनुष्यबळ विकास व्यवस्थापक नंदन सुर्वे, क्वॉलिटी डिपार्टमेंटचे आशिष रणदिवे, शीतल फडकले, दिशान्तर



सर्वतोपरी सहकार्याचा मानस
ग्रामीण भागातील महिलांमध्ये जिद्द आणि मेहनत करण्याची तयारी आहे. स्वयमच्या माध्यमातून महिलांनी आवश्यक ते कौशल्य शिकून उद्योजक म्हणून प्रगती करावी. केवळ कार्यशाळा घेऊन आम्ही थांबणार नाही तर भविष्यात या महिला उद्योजकांना आवश्यक ती मदत करण्याचा कंपनीचा मानस आहे.

श्री. संतोष देशमुख
कन्साई नेरोलॅक पेन्टस लि.
चीफ मॅनेजर अडमिनिस्ट्रेशन अँड सीएसआर

संस्थेचे अध्यक्ष राजेश जोष्टे, निवृत्त बँक अधिकारी आशा लोवलेकर, महाअशोहिनी या फिनान्शियल सर्व्हिसेसचे संस्थापक अभिषेक कदम, स्वाद केटरर्सच्या शुभदा संसारे, स्नेहा साडविलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यशाळेला आरंभ झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सोनाली खर्चे यांनी केले.

पहिल्या दिवसाच्या कार्यशाळेत उदयोकतेची ओळख व मानसिकता यामध्ये उद्योजकता म्हणजे काय, व्यक्तित्त्व विकास, प्रगतशील विचारसरणी, कल्पना पडताळणी व बाजारपेठेचा अभ्यास, व्यवसाय कल्पना, बाजारपेठ शोधन तर तिसऱ्या सत्रात तणाव व्यवस्थापन व आनंदी जीवनाचा ऊहापोह करण्यात आला. भारतातील सुवर्णयुगी कालखंडात पुरूष व महिला हे दोघेही कामातून अर्थशक्ती निर्माण करीत होते. याचमुळे त्या कालखंडाचा पुनंप्रत्यय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकालात सुरू झाल्याचे श्री. जयवर्धन यांनी नमूद केले.

## कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची झाडांसोबत फ्रेंडशिप

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**
मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयात मैत्री दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी झाडांना फ्रेंडशिप बेल्ट बांधून त्यांचे संगोपन व संवर्धनाचा निर्धार केला.तसेच वृक्ष न तोडण्याची प्रतिज्ञा केली. फ्रेंडशिप डे निमित्त झाडांबद्दल वाटणारे प्रेम व आपुलकी दाखवून दिली. प्रत्येक जण मैत्री जपतो प्रत्येकाचे कोणी ना कोणी जिवलग मित्र असतात. तसेच झाडे हे प्राणवायूचा पुरवठा करतात. फुले,फळे, गारवा देऊन मानवाच्या विविध गरजा पूर्ण करतात .म्हणून वृक्ष मानवाचे मित्र बनतात. अशा या झाडांशी मैत्रीचे नाते निर्माण करून विद्यार्थ्यांनी चांगला संदेश दिला. मैत्रीदिनानिमित्त प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी विद्यार्थ्यांना झाडांचे महत्त्व पटवून देत वृक्ष कुठली अपेक्षा न करता जीवसृष्टीला देण्याचे काम करतात. ते आपले खरे खरे मित्र होत. प्रत्येकाने वृक्ष लावली पाहिजेत त्यांची जोपासना केली पाहिजे.असे आवाहन केले.यावेळी कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा अभय वडघुले, प्रा प्रकाश आहेर ,एन .एस. एस .विभाग प्रमुख सुभाष निंबेकर,प्रा पूनम ठाकरे,प्रा मनिषा कोटकर,श्रीमती. पी. एन.ठाकरे, श्रीमती.एम.के.वावरे ,प्रा विद्या खैरनार ,तसेच वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक प्राध्यापिका व महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.






## शास्ती माफीच्या निर्णयासंदर्भात शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची भेट

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**
दि.17 जुलै 2025 रोजी महाराष्ट्राचे उप-मुख्यमंत्री यांनी शास्ती माफीच्या निर्णय केल्यानंतर पनवेलकर नागरिकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे खुप कौतुक केले परंतु 1 नोव्हेंबर 2022 पर्यंतचा मालमत्ता कर वसूल महानगरपालिका करत आहे या निर्णयामुळे अनेक रहिवाशांना मोठा आर्थिक बोजा सहन करावा लागत आहे. तरी या संदर्भात आज पनवेल नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेतली व त्यांच्या समोर काही मुद्दे उपस्थित करून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली.

यावेळी जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, खांदा कॉलनी शिवसेना शहरप्रमुख शिवाजी थोरवे, नवीन पनवेल शहरप्रमुख अतुल मोकल, उपशहरप्रमुख मच्छिंद्र झगडे, शाखाप्रमुख हितेंद्र पेडामकर आदींनी संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेवून त्यांना 2016 ते 31 ऑक्टोबर 2022 पर्यंतच्या



न्यायविभाग व नगरविकास विभागाकडे प्रलंबित असून, अंतिम निर्णय होईपर्यंत मागील वर्षांचा कर भरण्याची सक्ती होऊ नये. तसेच आर्थिक वर्ष 2022-23, 2023-24, 2024-25 आणि 2025-26 या चार वर्षांचा मालमत्ता कर एकत्र मागे वसूल केला जात असून, त्यासाठी 90% सूट देण्यात आली आहे. मात्र, आर्थिक दृष्ट्या कमकुवत नागरिकांना ही एकरकमी रक्कम भरणे कठीण जात आहे. त्यामुळे ही योजना फेर करून नागरीकांना टप्याटप्याने भरण्याची सवलत दयावी व 15 ऑक्टबर पर्यंत दिलेली मुदत पुढील 3 महिन्यापर्यंत वाढवुन दयावी व तसेच 31 जुलै पर्यंतची जी 5% सुट होती त्यामध्ये देखील 3 महिन्याची वाढ करण्यात यावी त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 129 (अ) नुसार 66 टक्के मालमत्ता कर सवलतीबाबत विचाराधीन आहे. आपण हा निर्णय तातडीने जाहीर करावा, अशी अपेक्षा आहे. व मालमत्ता धारकांनी मालमत्ता करासोबत शास्तीची रक्कम भरलेली आहे, त्यांना पुढील कर बिलामध्ये जी शास्ती रक्कम भरलेली आहे ती रक्कम नवीन येणा-या बिलामध्ये वजा करून मिळावी, अशी मागणी केली आहे.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# सिल्लोड मध्ये सीसीटीव्ही प्रणाली यंत्रणेचे लोकार्पण

## सीसीटीव्ही प्रणाली यंत्रणा पोलिसांसाठी तिसरा डोळा - आमदार अब्दुल सत्तार

**दैनिक युवक आधार**
**सिल्लोड प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

:-सिल्लोड येथे लोकार्पण करण्यात आलेले सीसीटीव्ही प्रणाली यंत्रणा पोलिसांसाठी तिसरा डोळा म्हणून काम करेल असे प्रतिपादन आमदार अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केले.

सीसीटीव्ही यंत्रणामुळे गुन्हेगारीला आळा बसेल, गुन्हेगारी घटनांचा तपास करण्यास पोलिसांना मोठी मदत होईल तसेच नागरिकांमध्ये देखील नियमांचे पालन होईल असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने सिल्लोड येथे बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही निगराणी प्रकल्पाचे उद्‌घाटन आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले. यावेळी पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. सिल्लोड शहर पोलीस स्टेशनच्या आवारात हा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना आमदार अब्दुल सत्तार बोलत होते.

यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य नामदेवराव चापे, जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेशकुमार कोल्हे, तहसीलदार सतीश सोनी, कृउबा समितीचे सभापती विश्वास पा. दाभाडे, केशवराव पा. तायडे , व्यापारी महासंघाचे अध्यक्ष दुर्गेश जैस्वाल, माजी सभापती रामदास पालोदकर, संचालक नंदकिशोर सहारे, श्रीरंग पा.साळवे, सतीश ताठे , विनोद मंडलेचा, विठ्ठल सपकाळ ,दुर्गाबाई पवार, शकुंतलाबाई बन्सोड, राजेंद्र ठोंबरे, पीएसआय बाबा मुंडे ,पीएसआय ज्ञानेश्वर कायंदे, सयाजीराव वाघ, संजय आरके, प्रशांत क्षीरसागर , नरसिंग चव्हाण ,जितू आरके, अक्षय मगर, बबलू पठाण ,शंकरराव खांडवे, सुभाष शेठ जैन, सुदर्शन अग्रवाल, मतीन देशमुख ,मानसिंग राजपूत, रवींद्र गायकवाड, कुणाल सहारे, मुस्ताक देशमुख, न.प. उपमुख्याधिकारी आयुब सय्यद , प्रशासकीय अधिकारी जुबेर सिद्दीकी, मानसिंग राजपूत ,आत्माराम अग्रवाल ,प्रताप प्रसाद, मनोज झंवर असिफ बागवान, लक्ष्मण कल्याणकर, सत्तार हुसेन, शेख जावेद, रमेश साळवे, रमेश लाठी, जगदीश बेदवे, रईस मुजावर , जुम्मा खा पठाण आदींची उपस्थिती होती.



पुढे बोलत असतांना आमदार अब्दुल सत्तार म्हणाले की, संपूर्ण सिल्लोड शहर सीसीटीव्हीच्या निगराणीखाली आले आहे . अनुचित प्रकार करणाऱ्यांवर आता सीसीटीव्हीच्या माध्यमातून पोलिसांची बाईकाईने नजर असणार आहे. सिल्लोड शहरातील एकूण 30 प्रमुख स्थळे , सार्वजनिक ठिकाणे, विविध चौकांमध्ये 132 अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. अनुचित प्रकार व जाणीवपूर्वक कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना सरळ करण्यासाठी पोलीस प्रशासन सक्षम आहे. त्यामुळे नागरिकांनी कायद्याचे उल्लंघन होऊन आपल्यावर गुन्हा दाखल करण्याची वेळ येवू नये याची दक्षता घ्यावी. नियमांचे काटेकोरपणे पालन करून पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन आमदार अब्दुल सत्तार यांनी आपल्या भाषणात केले.

**आमदार अब्दुल सत्तार यांचा पुढाकार**

आमदार अब्दुल सत्तार पालकमंत्री असतांना त्यांनी सिल्लोड, सोयगाव व फर्दापूर येथे अत्याधुनिक सीसीटीव्ही निगराणी प्रकल्प उभारण्यासाठी जिल्हा नियोजन मंडळातून मंजुरी देत यासाठी 12 कोटी 50 लाख रुपयांचा निधी मिळवून दिला होता. या प्रकल्प पूर्णत्वास येवून आज त्याचे उद्घाटन देखील आ. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले. या प्रकल्पाअंतर्गत अद्यावत नवीन टेक्नॉलॉजी चे कॅमेरे बसविण्यात आले आहेत, पुढील 5 वर्ष दुरुस्ती देखभाल संबंधित एजन्सीकडे असणार आहे.

सिल्लोडला मोठी बाजारपेठ असल्याने येथे नेहमी नागरिकांची वर्दळ असते. सण उत्सव येथे मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. तसेच जगप्रसिद्ध अजिंठा लेणी मुळे सिल्लोड - सोयगाव फर्दापुर येथे देशासह विदेशी पर्यटक येतात. अनेक धार्मिक तीर्थक्षेत्र आपल्याकडे आहे. शिवाय जळगाव - छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्ग, अजिंठा - बुलढाणा , सिल्लोड - जालना , सिल्लोड - कन्नड, सिल्लोड - छत्रपती संभाजीनगर, सोयगाव - चाळीसगाव यासारखे महामार्ग आपल्याकडे असल्याने या ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्यावर नजर ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची गरज होती असे आमदार अब्दुल सत्तार यांनी सांगितले.

सीसीटीव्ही प्रकल्पाच्या उदघाटन नंतर आमदार अब्दुल सत्तार व पोलीस अधिक्षक डॉ. राठोड यांनी सीसीटीव्ही प्रणाली प्रकल्पाची माहिती जाणून घेतली. आमदार अब्दुल सत्तार यांनी सीसीटीव्ही प्रकल्पाच्या माध्यमातून बसविण्यात आलेल्या अलौन्सिंग सिस्टीम मधून नागरिकांशी संवाद साधला. वाहनधारकांनी इतर वाहनांना अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यासह नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी सिल्लोड मतदारसंघात उभारण्यात आलेल्या सीसीटीव्ही प्रकल्पाचे श्रेय आमदार अब्दुल सत्तार यांना जात असल्याचे स्पष्ट केले.

आमदार अब्दुल सत्तार पालकमंत्री असताना त्यांनी वैजापूर आणि गंगापूर येथे सीसीटीव्ही कॅमेरे चे उद्‌घाटन केले होते. त्याच क्षणी त्यांनी आम्हाला सिल्लोड मतदारसंघात देखील याहून अधिक हायटेक, अत्याधुनिक पद्धतीचे सीसीटीव्ही प्रकल्प उभारण्याबाबत आदेश दिले होते. त्या अनुषंगाने आम्ही या आदेशाचे पालन केले. आज सिल्लोड, सोयगाव आणि फर्दापूर येथे सुरू करण्यात आलेल्या सीसीटीव्ही प्रणालीचे श्रेय हे आमदार अब्दुल सत्तार यांना जात असल्याचे पोलीस अधीक्षक राठोड म्हणाले.

पुढे बोलत असताना पोलीस अधीक्षक राठोड यांनी सीसीटीव्ही प्रकल्प बाबत सविस्तर माहिती दिली. या प्रकल्प अंतर्गत 90 दिवस या प्रणालीमध्ये रेकॉर्डिंग कायम असते, या प्रणालीमुळे निश्चितपणे गुन्हेगारीला आळा बसेल .गेल्या महिन्यात सिल्लोड येथे दोन घटनांना उघडकिस करण्यास या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा उपयोग झाला असल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितले. अनेक वेळा न्यायालयामध्ये साक्षीदार आपली साक्ष बदलतो ,या सीसीटीव्ही कॅमेरे प्रणालीमुळे आता असा प्रकार होणार नाही असे देखील ते म्हणाले. येणारा गणेश उत्सव व इतर सर्व उत्सव शांततेत पार पाडा असे आवाहन करीत आपल्यावर गुन्हा नोंद होईल अशी कोणतीही कृत करू नका असे डॉ.राठोड म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रशांत जोशी यांनी केले, प्रस्ताविक उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश कोल्हे यांनी तर शेवटी पोलीस निरीक्षक शेषराव उदार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## "बाप्पाच्या आगमनाची ओढ "

"गणपती बाप्पा मोरया!" या एकाच शब्दात जणू आनंद, श्रद्धा आणि उत्सव एकत्र गुंफले आहेत. गणेश चतुर्थी जवळ येते तसं प्रत्येकाच्या मनात बाप्पाच्या आगमनाची ओढ अधिकच वाढते. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळेच त्या दिवशीची वाट पाहत असतात.



**बाप्पा म्हणजे आनंदाचे स्त्रोत:**
श्री गणेश हे अडथळे दूर करणारे, यशदायक आणि सुखसमृद्धीचे प्रतीक आहेत. त्यांच्या आगमनाने घरात सकारात्मकता आणि आनंदाचा वर्षाव होतो. म्हणूनच बाप्पाच्या आगमनाला केवळ एक धार्मिक घटना न मानता, तो एक भावनिक अनुभव मानला जातो.

**तयारीची लगबग:**
गणेश चतुर्थी काही आठवडे दूर असली, तरी घराघरात तयारी सुरू होते. नवे कपडे, सजावटीच्या वस्तू, आरास, पूजेचे साहित्य यांची जमवाजमव सुरू होते. गावी असो की शहरात – सगळीकडे उत्साहाचं वातावरण असतं. सार्वजनिक मंडळांमध्ये देखाव्यांचं नियोजन, ढोल-ताशांचे सराव, स्वयंसेवकांची लगबग दिसून येते.

**मूर्ती निवडण्याचा क्षण:**
बाप्पाची मूर्ती घरी आणण्याचा दिवस हा प्रत्येकासाठी खास असतो. जी मूर्ती पाहून मन भरून येतं, डोळ्यांत आनंदाचे अश्रू येतात, तीच मूर्ती निवडली जाते. बाप्पाला घरी आणताना मिरवणुकीतील ढोल-ताशांचा गजर, गुलाल, फुलं आणि जयघोष वातावरण भारावून टाकतो.

**भावनिक नातं:**
बाप्पा हा देव न वाटता आपल्या कुटुंबातला एक लाडका सदस्य वाटतो. त्याच्यासाठी मोदक बनवले जातात, गाणी गाण्यात येतात, त्याच्याशी बोललं जातं. लहान मुलांसाठी तर बाप्पा म्हणजे त्यांचा एक खास मित्रच असतो.

बाप्पाच्या आगमनाची ओढ म्हणजे श्रद्धा, संस्कृती, एकोपा आणि आनंदाचं प्रतीक आहे. तो फक्त एक सण नसतो, तर तो आपल्या मनाशी आणि समाजाशी जोडलेलं नातं असतो. म्हणूनच दरवर्षी गणपती बाप्पाच्या आगमनाची ही ओढ, ही आतुरता आपल्या मनात घर करून असते.

बाप्पाचं आगमन म्हणजे केवळ मूर्तीची स्थापना नव्हे,तर आपल्या श्रद्धेच संस्कृतीचं आणि एकोपाचं प्रतिबिंब आहे. म्हणूनच,दरवर्षी त्याच्या स्वागतासाठी मन अतुर असतं कारण – बाप्पा फक्त देव नाही.... तो आपला आहे

**(नम्रता स्वरूप घोडके)**

## महावितरणचे वीज बिल डाऊनलोड करण्यासाठी आता 'लॉगिन' अनिवार्य*

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू नागपूर संपदाक आवृत्ती**


मुंबई, दि. ०५ ऑगस्ट २०२५: सायबर सुरक्षितता तसेच वीज ग्राहक माहितीच्या गोपनीयतेसाठी महावितरणच्या लघुदाब वर्गवारीच्या वीजबिलाची पीडीएफ प्रत अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाइन डाऊनलोड करण्यासाठी आता संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) करणे अनिवार्य करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या सायबर सुरक्षेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार हा बदल करण्यात आला आहे.

महावितरणच्या WWW.MAHADISCOM.IN या अधिकृत संकेतस्थळावरील 'वीजदेयक अवलोकन/भरणा' (VIEW/ PAY BILL) पेजवर लघुदाब वर्गवारीतील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर ग्राहकांना चालू महिन्याच्या वीजबिलाची पीडीएफ प्रत ऑनलाइन डाऊनलोड करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र याआधी केवळ १२ अंकी ग्राहक क्रमांक सबमीट करून वीजबिल डाऊनलोड करण्याची सोय उपलब्ध होती.आता नव्या बदलात वीज बिल लॉगिनशिवाय ऑनलाइन भरण्याचा पर्याय खुला ठेवण्यात आला आहे. मात्र पीडीएफ वीजबिल डाऊनलोड करण्यासाठी नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) करणे अनिवार्य आहे. लॉगिनची लिंकदेखील 'वीजदेयक अवलोकन/भरणा' (VIEW/PAY BILL) पेजवर उपलब्ध आहे. तसेच ज्या ग्राहकांनी आतापर्यंत लॉगिनसाठी नोंदणी केलेली नाही त्यांनी ग्राहक क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक तसेच ई-मेल (असल्यास) माहिती भरून नोंदणी करणे तसेच प्रवेश नाम (लॉगिन आयडी) व पासवर्ड (परवली शब्द) निश्चित करणे आवश्यक आहे. त्यासाठी देखील लिंक त्याच ठिकाणी उपलब्ध आहे.नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) केल्यानंतर स्वतःच्या एकापेक्षा अधिक वीजजोडण्यांसाठी विविध ऑनलाइन सेवा उपलब्ध आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी लॉगिन केल्यानंतर १२ अंकी ग्राहक क्रमांक लक्षात ठेवण्याची आवश्यकता नाही. तसेच वीज बिलावरील नाव, वीज भार बदलणे, तक्रार करणे किंवा तक्रारीची सद्यस्थिती पाहणे, वीज बिलांचा भरणा, पत्ता बदलणे व इतर सर्व ऑनलाइन सेवांचा वीज ग्राहकांना लाभ घेता येईल.

# देगांव - उन्हवरे गावच्या सीमेवरील व्याघ्रेश्वर मंदिराची थोर महती..

**दैनिक युवक आधार**
**दापोली : - (प्रमोद तरळ)**

तालुक्यातील देगांव - उन्हवरे गावाच्या सीमेवर शंभर वर्षांपासूनचे व्याघ्रेश्वराचं जुनं मंदिर आहे. कोकणातील महादेवाची मंदिरे म्हणजे निसर्गसौंदर्य, शांतता आणि अद्‌भुततेचा मिलाफ. प्रत्येक ठिकाणाचं काही ना काही आगळं वैशिष्ट्य आहे. या जागृत शिवस्थानांपैकी एक म्हणजे देगांव - उन्हवरे रस्तावरून अडीच किलो मिटर अंतरावर असणारे हे व्याघ्रेश्वराचं मंदिर. हे ठिकाण अतिशय घनदाट जंगलात असून पूर्वी गावातील शेतकरी गूरे चारण्यासाठी रानमाळावर



आणत असत. तेंव्हा या ठिकाणी गायी येऊन पान्हा सोडून निघून जात असत. या गोष्टीचा शोध घेतला असता तेथे शंकराची पिंड असल्याचे समजले. तेथून मग हे ठिकाण गावकरी श्रध्देने पूजू लागले. वासुबारस या दिवशी मंदिरात वाघ येऊन आपली शेवटी आपटून देवाकडे कळा मागतो.

गावात गुरं ढोरांचा पाय मोडला तर भक्त लाकडी पाय बनवून नवस बोलत,एखाद्या व्यक्तीचा कान दुखत असल्यास लाकडी कान बनवून वाघोबाला अर्पण करून नवस बोलत, पावसाळी लावणीच्या काळात पाऊस पडत नसे त्यावेळी " लाल जोंधळा सुकला विठोबा वाघोबा देवा पाऊस दे" असे साकडे गावकरी करत.आगोट व सराईचा नैवद्य म्हणजे बोरीवसा आजही पारंपारिक पद्धतीने साजरा केला जातो.

असे शंभर वर्ष जुने असणारे आणि भक्तांच्या नवसाला पावणारे वाघोबाचे मंदिर. शिमग्यामध्ये देगांव व उन्हवरे गावाच्या ग्रामदैवतांच्या दोन पालख्यांचे संगम होते.तसेच महाशिवरात्र / श्रावणी सोमवार साजरे होतात. श्रावण महिन्यात तर देगांव,दाभीळ,पांगारी व उन्हवरे गावच्या भाविक भक्तांनी मंदिर अगदी भक्तीमय होते.

"व्याघ्रेश्वर मंदिर जत्रा" जत्रेत हरवलेलं बालपण आठवतं.पूर्वी जत्रेत दुकानं कमी प्रमाणात होती.पण जत्रेतील लिंबाच्या व पेपर मिठाच्या गोळा फार आवडत.गोळ्या चोखुन झाल्यावर एक ग्लास पाणी पिल्याने जत्रेतील खरा आनंद मिळायचा.

मंदिरात मोठ्या आकाराचा अतिशय सुबक असा नंदी आहे.

असे देगांव गावाच्या माथ्यावर व्याघ्रेश्वराचे असणारे हे मंदिर संपूर्ण तालुक्यात प्रसिद्ध असून तालुक्यातील प्रमुख ठिकाणपैकी एक असल्याचे माहिती मौजे देगांव ग्रामविकास मंडळ मुंबईच्या वतीने दिली आहे

# येरगी बालिका पंचायतकडून सिमेवरील जवानांना राख्या रवाना.

**दैनिक युवक आधार**
**देगलूर तालूका प्रतिनिधी:महादेव उप्पे**

नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येथील येथील बालिका पंचायत राज समितीच्या वतीने गावातून भारतीय जवानांना राख्या पाठवण्यात आल्या आहेत.जिल्ह्यातील कंधार येथील सुंदर अक्षर कार्यशाळेचा दरवर्षी भारतीय सीमेवरील जवानांना ३३३३ राख्या पाठवण्यात येतात.त्यांचा या उपक्रमाचा हा बारावा वर्ष असून त्यात येरगी बालिका पंचायत सहभागी झाले आहे. येरगी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत या संदर्भात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊन या उपक्रमाची माहिती गावचे सरपंच संतोष पाटील यांनी दिली.यावेळी बालिका पंचायतचे पदाधिकारी शाळेचे मुख्याध्यापक अशोक देवकत्ते व सर्व शिक्षक आदी उपस्थित होते.

या उपक्रमासाठी बालिका पंचायत,शाळेतील मुली आणि गावातील महिला सामील होऊन देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांना राख्या व त्यासोबत सदिच्छा पत्र पाठवले आहेत



.सदरील राख्या भारतीय सीमेवर असणाऱ्या जवानांना राखी पौर्णिमेच्या दिवशी मिळतील असे नियोजन करण्यात आले आहे.

यावेळी गावचे सरपंच संतोष पाटील,मुख्याध्यापक अशोक देवकत्ते शिक्षक ईश्वर वाडीकर,भुमन्ना तेलगे,राहुल ढगे,रमाकांत वाघमारे, अंगनवाडी कर्मचारी गंगामणी दारलावार,हानमाबाई बरसमवार, शितल मठपती,मजुळा सिलमकुटवार,नागमणी बरसमवार तसेच बालिका पंचायत राज समितीचे सरपंच अंजली वाघमारे,उपसरपंच पुनम सुर्यवंशी,ग्रामसेवक महादेव दाणेवार,पोलिस पाटील अनिता बागेवार,शालेय शिक्षण समिती अध्यक्ष सपना कालिंगवार,तंटामुक्त अध्यक्ष शिवकांत भुरळे,ग्रामपंचायत सदस्य रुद्राणी चैडके,महादेव कुंचगे, रितीका चिटकुलवार,हरीका तोटावार,महादेव गोशेट्टी,आश्विनी लोहार,मोनीका माळगे आदी उपस्थित

## जय गणेश मित्र मंडळा तर्फे जि.प. केंद्र शाळा ओझर नं १ मध्ये शैक्षणिक साहित्य वाटप

**दैनिक युवक आधार**
**राजापूर:- (प्रमोद तरळ)**

जि. प. प्राथ. केंद्रशाळा ओझर नं. १ मध्ये जय गणेश मित्र मंडळ,ओझर यांच्या वतीने १ ली ते ७ वी मधील सर्व विद्यार्थी यांना प्रत्येकी २ वह्या व १ पेन या स्वरूपात शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी गावचे सरपंच मा. श्री. विकास रेगे, मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. भरत गुरव, सचिव मा. श्री. पांडुरंग ताम्हणकर, खजिनदार मा. श्री. नजीर टोले, सहखजिनदार मा. श्री. हरिश्चंद्र गुरव, गावचे पोलीस पाटील मा. श्री. विलास कुर्ले तसेच मंडळाचे कार्यकर्ते, गावातील प्रतिष्टीत नागरिक, पालक, ग्रामस्थ अंगणवाडी सेविका व मदतनीस, ओझर नंबर १ व ओझर नंबर २ शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. गायकवाड गुरुजी यांनी केले तर आभार श्री. बंदसोडे गुरुजी यांनी मानले.

यावेळी मंडळाचे सचिव पांडुरंग ताम्हणकर यांनी शाळेतील कामकाज उत्तम प्रकारे चालले असल्याबद्दल दोन्ही शाळेच्या मुख्याध्यापक यांचे पुष्प देऊन आभार व्यक्त केले. पुढील शैक्षणिक वाटचालीस शाळेला शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापक श्री. मोरे गुरुजी यांनी मंडळाच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या तसेच मुलांसाठी करियर मार्गदर्शन मेळावा आयोजित करण्यासंदर्भात मंडळाला विनंती केली.शेवटी मंडळाच्या वतीने सर्व मुलांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# महसूल दिन सप्ताहात निफाड तहसील कार्यालयात अधिकारी–कर्मचाऱ्यांचा गौरव सोहळा

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

निफाड तहसील कार्यालयात सोमवार दि ४ ऑगस्ट रोजी सत्कार समारंभ पार पडला. महसूल विभागाच्या कार्यक्षमतेत मोलाचे योगदान देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा या कार्यक्रमात विशेष सत्कार करण्यात आला. उपविभागीय अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांच्या अध्यक्षतेखाली व तहसीलदार श्री. विशाल नाईकवाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमात महसूल विभागातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. यात निवडणूक नायब तहसीलदार श्री




**उत्कृष्ट ग्राम महसूल अधिकारी प्रसाद देशमुख यांचा सत्कार करतांना प्रांत डॉ शशिकांत मंगरुळे, समवेत तहसीलदार विशाल नाईकवाडे**

राहुल मुळीक, मंडळ अधिकारी श्री ज्ञानेश्वर पगार, तलाठी श्री राहुल अहिरे, श्री नितेश निंबाळकर, अव्वल कारकून श्रीम वैशाली हिंडे, महसूल सहायक विजय चव्हाण व , गणेश कुमावत यांचा यामध्ये समावेश होता. मागील वर्षभरात क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात बहुमोल कामगिरी बजावणाऱ्या श्री शंकर खडांगळे, प्रसाद देशमुख, लक्ष्मीकांत शिंदे , दिपक पवार, प्रफुल्ल गवळी यांच्या कार्यकर्तृत्वाची दखल घेत त्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमात डॉ. शशिकांत मंगरुळे यांनी आपल्या भाषणात महसूल विभागाच्या कार्यपद्धतीत झालेल्या सकारात्मक बदलांबद्दल समाधान व्यक्त केले. निफाड तालुका महसूल कामकाजाच्या दृष्टीने सातत्याने प्रगती करत आहे. पारदर्शकता, तत्परता आणि जनसेवेचा दृष्टिकोन ठेवून काम करणं हीच आपल्या विभागाची ओळख व्हावी, असे त्यांनी सांगितले. तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी आपल्या मनोगतातून,महसूल दिन सप्ताह हा केवळ एक औपचारिकता नसून, हा आपल्या कामाचा आढावा घेण्याचा आणि उत्तम कामगिरी करणाऱ्यांना प्रेरणा देण्याचा एक उपक्रम आहे,असे सांगत सर्व सहकाऱ्यांचे कौतुक केले.\ कार्यक्रमाचे संयोजन तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्तम प्रकारे केले होते. यावेळी विभागातील अनेक अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. हा गौरव सोहळा उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला असून, महसूल विभागाच्या अधिक गुणवत्तापूर्ण कार्यासाठी एक सकारात्मक पाऊल ठरला आहे.

# महाराष्ट्र शासनातर्फे एक ऑगस्ट ते सात ऑगस्ट महसूल सप्ताह राबवण्याचा संकल्प.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किसन जावळे साहेब तसेच उपविभागीय अधिकारी पवन चांडक साहेब उरण तहसीलचे तहसीलदार डॉक्टर उद्धव कदम नायब तहसीलदार नरेश पेडवी यांचे प्रमुख मार्गदर्शनाखाली आज दिनांक ०४/०८/२०२५ रोजी उरण एज्युकेशन सोसायटी हायस्कूल बोरी येथे महसूल सप्ताह अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराज राजस्व अभियान अभियान राबविण्यात आले. आज दिनांक ०४/०८/२०२५ रोजी महाराष्ट्र शासनातर्फे महसूल सप्ताह एक ऑगस्ट ते सात ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह अंतर्गत राबविण्याचा असून शासनातर्फे आज दिनांक ०४/०८/२०२५ रोजी उरण उरण एज्युकेशन सोसायटी बोरी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व महाराज राजस्व अभियान शिबिर करण्यात आले होते सदर शिबिरास तहसीलदार उरण डॉक्टर श्री उद्धव कदम नायब तहसीलदार श्री नरेश पेडवी व उरण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर मानध सचिव राजेंद्र भानुशाली सहसचिव अपूर्वा ठाकूर माजी अध्यक्ष जैन प्राचार्य सिमल दहिया नगरसेवक अतुल ठाकूर माजी नगरसेवक आर लांबे तेजाब मस्के समाजसेवक बोरी तसेच मंडळ अधिकारी मंडळ अधिकारी बी जी बासंबेकर तलाठी किरण दाभेकर समीरा गावंड कांचन वडगावकर प्रज्ञा घागरे गावातील सुमारे दीडशे ते दोनशे नागरिक उपस्थित होते सदर अभियानांतर्गत सर्व प्रकारचे शासकीय दाखले सातबारा उतारे आयुष्यमान भारत कार्ड संजय गांधी निराधार योजना इत्यादीचे वाटप व वाटप व अर्ज भरून घेण्याचे काम करण्यात आले करण्यात आले यामध्ये यामध्ये रहिवासी दाखले दोन उत्पन्न दाखला नऊ जातीचे दाखले ४० रेशन कार्ड सात वाटप करण्यात आले तसेच संजय गांधी निराधार योजनेचे पाच फॉर्म भरून घेण्यात आलेत आयुष्यमान भारत कार्ड तेरा कार्ड वाटप करण्यात आले यावेळी नागरिकांनी मोठा उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.




# शाळेत भरला 22 वर्षानंतर माजी विद्यार्थी स्नेह मेळावा

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

22 वर्षा नंतर शाळेतील आठवणींना सर्वांनी आणि एकदा लहान होऊन शाळेंत जाऊन एक दिवसाची शाळा भरवली.
दिनांक 3/8/2025 रोजी निवृत्तीराव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जामगाव तालुका आष्टी जिल्हा बीड या शाळेतील माजी विद्यार्थी दहावी बॅच 2003 यांचा स्नेह मेळावा प्रथमच 22 वर्षानंतर घडून आला या वेळी जवळजवळ 40 विद्यार्थी , विद्यार्थिनी आणि 10 शिक्षक हे उपस्थित राहिले होते यावेळी वेगवेगळ्या क्षेत्रात जसे की डॉक्टर ,इंजिनिअर, शिक्षक , पोलिस, आरोग्य व शेती व इतर व्यवसायिक उद्योजक माजी विद्यार्थी यांनी शाळेत येऊन आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री.मोकाशे सर, श्री आदनाक सर, श्री ढोबे सर, श्री कांबळे सर , श्री घोडके सर, श्री होळकर सर ,श्री शेळके सर श्री गळगटे सर ,श्री भोसले सर , श्री हरकर



सर, इत्यादी शिक्षक उपस्थित राहिले व त्यांचे सहर्ष स्वागत करण्यात आले त्याचप्रमाणे विद्यार्थी विद्यार्थिनी मध्ये खेळांच्या मॅचेस खो खो खेळ तसेच संगीत खुर्ची इत्यादी खेळ घेण्यात आले.
22 वर्षा नंतर शाळेतील आठवणींना सर्वांनी आणि एकदा लहान होऊन शाळेंत जाऊन एक दिवसाची शाळा भरवली.
सर्व विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा घडवून आणण्यात श्री डॉ. संदीप शिंदे (पशुधन विकास अधिकारी ) ,विकास धस ( प्राथमिक शिक्षक ), डॉ.संजीवनी धस (डेंटिस्ट.) श्री आसिफ पठाण (उद्योजक) यांनी मोलाची भूमिका घेतली.
22 वर्षा नंतर शाळेतील आठवणींना सर्वांनी आणि एकदा लहान होऊन शाळेंत जाऊन एक दिवसाची शाळा भरवली.
*शाळेत भरला 22 वर्षा नंतर माझी विद्यार्थी स्नेह मेळावा .
दिनांक 3. 8 .2025 रोजी निवृत्तीराव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जामगाव तालुका आष्टी जिल्हा बीड या शाळेतील माजी विद्यार्थी दहावी बॅच 2003 यांचा स्नेह मेळावा प्रथमच 22 वर्षानंतर घडून आला या वेळी जवळजवळ 40 विद्यार्थी , विद्यार्थिनी आणि 10 शिक्षक हे उपस्थित राहिले होते यावेळी वेगवेगळ्या क्षेत्रात जसे की डॉक्टर ,इंजिनिअर, शिक्षक , पोलिस, आरोग्य व शेती व इतर व्यवसायिक उद्योजक माजी विद्यार्थी यांनी शाळेत येऊन आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री.मोकाशे सर, श्री आदनाक सर, श्री ढोबे सर, श्री कांबळे सर , श्री घोडके सर, श्री होळकर सर ,श्री शेळके सर श्री गळगटे सर ,श्री भोसले सर , श्री हरकर सर, इत्यादी शिक्षक उपस्थित राहिले व त्यांचे सहर्ष स्वागत करण्यात आले त्याचप्रमाणे विद्यार्थी विद्यार्थिनी मध्ये खेळांच्या मॅचेस खो खो खेळ तसेच संगीत खुर्ची इत्यादी खेळ घेण्यात आले. 22 वर्षा नंतर शाळेतील आठवणींना सर्वांनी आणि एकदा लहान होऊन शाळेंत जाऊन एक दिवसाची शाळा भरवली. सर्व विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा घडवून आणण्यात श्री डॉ. संदीप शिंदे (पशुधन विकास अधिकारी ) ,विकास धस ( प्राथमिक शिक्षक ), डॉ.संजीवनी धस (डेंटिस्ट.) श्री आसिफ पठाण (उद्योजक) यांनी मोलाची भूमिका घेतली.
22 वर्षा नंतर शाळेतील आठवणींना सर्वांनी आणि एकदा लहान होऊन शाळेंत जाऊन एक दिवसाची शाळा भरवली.
*शाळेत भरला 22 वर्षा नंतर माझी विद्यार्थी स्नेह मेळावा . दिनांक 3. 8 .2025 रोजी निवृत्तीराव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जामगाव तालुका आष्टी जिल्हा बीड या शाळेतील माजी विद्यार्थी दहावी बॅच 2003 यांचा स्नेह मेळावा प्रथमच 22 वर्षानंतर घडून आला या वेळी जवळजवळ 40 विद्यार्थी , विद्यार्थिनी आणि 10 शिक्षक हे उपस्थित राहिले होते यावेळी वेगवेगळ्या क्षेत्रात जसे की डॉक्टर ,इंजिनिअर, शिक्षक , पोलिस, आरोग्य व शेती व इतर व्यवसायिक उद्योजक माजी विद्यार्थी यांनी शाळेत येऊन आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री.मोकाशे सर, श्री आदनाक सर, श्री ढोबे सर, श्री कांबळे सर , श्री घोडके सर, श्री होळकर सर ,श्री शेळके सर श्री गळगटे सर ,श्री भोसले सर , श्री हरकर सर, इत्यादी शिक्षक उपस्थित राहिले व त्यांचे सहर्ष स्वागत करण्यात आले त्याचप्रमाणे विद्यार्थी विद्यार्थिनी मध्ये खेळांच्या मॅचेस खो खो खेळ तसेच संगीत खुर्ची इत्यादी खेळ घेण्यात आले. 22 वर्षा नंतर शाळेतील आठवणींना सर्वांनी आणि एकदा लहान होऊन शाळेंत जाऊन एक दिवसाची शाळा भरवली.
सर्व विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा घडवून आणण्यात श्री डॉ. संदीप शिंदे (पशुधन विकास अधिकारी ) ,विकास धस ( प्राथमिक शिक्षक ), डॉ.संजीवनी धस (डेंटिस्ट.) श्री आसिफ पठाण (उद्योजक) यांनी मोलाची भूमिका घेतली.

# हिवरकर पोलीस अकॅडमीच्या शिक्षकाची,शाळेतीलच मुलीशी जातीयवादी वर्तणूक करून मुलीला ब्लॅकमेल करण्याचा प्रकार

## पत्रकार संजीव भांबोरे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याशी केली चर्चा

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे भंडारा-**

अड्याळ पोलीसअंतर्गत येत असलेल्या हिवरकर पोलीस अकॅडमी चे संचालक व त्याच शाळेत पेशाने शिक्षक असलेले नितेश हिवरकर या शिक्षकाने शाळेतीलच विद्यार्थिनी सोबत 28 जुलैला रात्री साडेआठ वाजता जातीयवादी शब्दाचा वापर करून मुलीला ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न केला. इतकेच नव्हे तर त्या मुलीला पैशाची गर्मी दाखवून तुझ्या माय बापाला मीच विकत घेऊ शकतो एवढा पैसा माझ्याकडे आहे तुला जे काही संबंध ठेवायचे असतील ते माझ्यासोबतच ठेव मायऱ्या मुयऱ्या मुलासोबत संबंध ठेवू नकोस नाहीतर तुझ्या गेम केल्याशिवाय राहणार नाही अशा पद्धतीची एक व्हाईस रेकॉर्डिंग सोशल मीडियावर व्हायरल झाली असून या संबंधात अड्याळ पोलीस स्टेशन येथे फिर्यादी शुभम लोणारे नवेगाव बाजार वय 27 यांच्या तक्रारीवरून आरोपी नितेश हिवरकर वय 40 यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन अड्याळ येथे
भारतीय न्याय संहिता बीएनएस 2023-75(2), भारतीय न्याय संहिता बी एन एस 2023-352, , भारतीय न्याय संहिता बी एन एस 2023- 351(2) अनुसूचित जाती



आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम 1989, , अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रतिबंधक अधिनियम 1989 3(i )(S) या विविध कलमाद्वारे गुन्हा दाखल झाला असून आरोपीला ताब्यात सुद्धा घेण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे अट्रॉसिटी सुद्धा दाखल करण्यात आलेली आहे. याविषयी पत्रकार संजीव भांबोरे यांनी मान्यवरांच्या प्रतिक्रिया घेतले असता त्यांना समाजात जातीय तेढ निर्माण करून दोन समाजात दुरावा निर्माण करण्याचा हा एक प्रकार असल्याचे यावेळेस त्यांनी सांगितले व अशा प्रकारे वर्गातीलच मुलींची गैरवर्तन करून तिला एक ब्लॅकमेल करण्याचा हा हा त्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले त्याचप्रमाणे उपविभागीय पोलीस अधिकारी मनोज सिडाम यांच्याशी पत्रकार संजीव भांबोरे यांनी चर्चा केली असता आरोपीला अटक करण्यात आली असून आरोपी विरुद्ध कलमाद्वारे गुन्ह्याची नोंद करण्यात आलेली असल्याचे व आरोपीला अटक सुद्धा करण्यात आल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी मनोज सिडाम करीत आहेत.

# दिव्यातील हिंदी भाषेचा पेपर असणाऱ्या शाळेवर दिवा मनसेची धडक.

**दैनिक युवक आधार,**
**रमेश राऊत, कल्याण ग्रामीण प्रतिनिधी.**

दि.६, दिवा(ठाणे):-दिव्यातील कुबेरेश्वर महादेव इंग्लिश स्कूल या शाळेत सोमवारी
३ री च्या विद्यार्थ्यांचा हिंदी भाषेचा पेपर असल्याची माहिती मनसेचे शहर सचिव प्रशांत गावडे यांना मिळाली. याबाबत खातरजमा केल्यानंतर मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी शाळेवर धडक देऊन शाळा व्यवस्थापनाला जाब विचारला. इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना हिंदी शिकवण्याच्या निर्णय शासनाने रद्द केलेला असतानाही अशा प्रकारच्या कुठल्याही शासन निर्णयाची माहितीच नसल्याचे धक्कादायक विधान शाळा व्यवस्थापकांनी केले आहे. दिव्यातील शाळांमध्ये हिंदी भाषा शिकवली जात



असल्याबाबतचे पत्र बुधवारी मनसे नेते अविनाश जाधव आणि शहर अध्यक्ष तुषार पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने शिक्षण अधिकाऱ्यांना दिले होते. अशा शाळांवर कारवाई करण्याची मागणी देखील करण्यात आली होती. मनसेच्या विरोधा नंतर संबंधित शाळेने १ली ते ४थी पर्यंतची हिंदी विषयाची परीक्षा तात्काळ स्थगित केली असून भविष्यात अशा प्रकारे कुठलीही कृती करणार नाही अशी लेखी हमी शाळेने दिवा मनसेला दिली आहे. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दिवा शहर सचिव प्रशांत गावडे, विभाग अध्यक्ष शरद पाटील, उपविभाग अध्यक्ष सुशांत पोस्टतांडेल, शाखाध्यक्ष सागर निकम, धनेश पाटील, महादेव पाटील आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# भारतीय संस्कृतीची जपणूक करणारी मॉडेल डॉ. सारिका शहा

**दैनिक युवक आधार -**
**घाटंजी प्रतिनिधि. महेश पेन्दोर**

यवतमाळ :मॉडेल म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर पाश्चात्य पेहराव आणि कमी कपड्यांमध्ये वावरणारे लोक येतात. मात्र, याच मॉडेलिंगच्या जगात भारतीय संस्कृतीची ओळख जपणाऱ्या डॉ. सारिका महेश शहा यांनी एक वेगळीच ओळख निर्माण केली आहे. यवतमाळमधील रहिवासी असलेल्या डॉ. सारिका या पेशाने पॅथॉलॉजिस्ट आहेत. त्यांनी मॉडेलिंग हा छंद म्हणून स्वीकारला आणि भारतीय संस्कृतीला धरून अनेक सौंदर्य स्पर्धांमध्ये यश मिळवले.
डॉ. सारिका शहा यांचे यश आणि सन्मान
डॉ. सारिका शहा यांनी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सौंदर्य स्पर्धांमध्ये विजेतेपद पटकावले आहे. त्यांच्या काही प्रमुख उपलब्धी खालीलप्रमाणे:
मिसेस युनायटेड नेशन्स वर्ल्ड फायनल (२०१९): विजेत्या
मिसेस दिवा ऑफ इंडिया इंटरनॅशनल (२०१९): विजेत्या
मिसेस वर्ल्ड (२०१८): फर्स्ट रनर-अप
गृहसहेली मिसेस इंडिया (२०१७): सेकंड रनर-अप
भारत भूषण अवॉर्ड (२०२१): सन्मानित
सामाजिक कार्याची मोठी ओळख
डॉ. सारिका शहा मॉडेलिंगसोबतच सामाजिक क्षेत्रातही सक्रिय आहेत. त्यांनी अनेक संस्थांमध्ये महत्त्वपूर्ण पदे भूषवली आहेत.
महिला सुरक्षा फाउंडेशन: महाराष्ट्र राज्य सचिव
राष्ट्रीय नारी सशक्तिकरण: महाराष्ट्र राज्य अध्यक्ष
हिंदू वेलफेअर फाउंडेशन: महाराष्ट्र राज्य अध्यक्ष
जयहिंद सैनिक संस्था: राष्ट्रीय संरक्षक
भारतीय जैन संघटना (२०२५ पासून): यवतमाळ महिला अध्यक्ष
IMA वुमेन्स विंग यवतमाळ (२०२२): अध्यक्षा
यासोबतच, त्या ऑर्गन ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेटर म्हणून अवयवदानाविषयी जागरूकता निर्माण करण्याचे काम करतात. त्यांनी 'स्मार्ट गर्ल ट्रेनर' म्हणून आतापर्यंत ४००० हून अधिक मुलींना सक्षम केले आहे. तसेच, ३००० हून अधिक मुलींची मोफत रक्त तपासणी करून त्यांना अनिमियामुक्त केले आहे.गर्भवती महिलांसाठी 'गर्भसंस्कार' शिबिरे घेण्यासोबतच त्या रेकी ग्रँडमास्टर आणि लामा फेरा हीलर म्हणूनही कार्यरत आहेत. मॉडेलिंगच्या माध्यमातून आपल्या भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवत, सामाजिक कार्याला वाहून घेणाऱ्या डॉ. सारिका शहा यांचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी आहे.

# मार्कडा येथे महाराजस्व अभियान संपन्न

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**






मेटीखेडा:- तालुका कळंब अंतर्गत मेटीखेडा मंडळातील मार्कडा (गट ग्रामपंचायत कोळेझरी) येथे महाराजस्व अभियान कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंचा आश्विनी दिलीप पवार होते,उदघाटक उपसरपंच गौतम थुल होते. तहसीलदार धीरज स्थूल यांच्या मार्गदर्शन खाली कनिष्ठ प्राथमिक मराठी शाळा मार्कडा येथे घेण्यात आली आहे.नुकतेच शाळेचे सत्र सुरू झाल्याने,विद्यार्थी व पालक यांना विविध प्रकारचे दाखले व प्रमाणपत्रे मिळविण्याकरिता अप्पर तहसिल मेटीखेडा व तहसील कळंब पर्यंत पायपीट करावी लागते. तसेच शेतकरी बांधव,निराधार वृध्द लोकांना एकाच छताखाली विविध प्रकारचे प्रमाणपत्रे मिळणे सोईचे व्हावे याकरिता, मेटीखेडा मंडळातील मार्कडा येथे दि ४ ऑगस्ट २०२५ रोजी सोमवारी सकाळी ११ वाजता पासून ५ वाजेपर्यंत महाराजस्व अभियान विविध योजना व दाखला च्या नोंदी करण्यात आला आहे.यामध्ये आरोग्य शिबीर, ॲग्रीस्टाग नोंदणी,निराधार नोंदणी,उत्पन्न ,गृहचौकशी अहवाल,७/१२,फेरफार वाटप इत्यादी विविध विभागाचे कर्मचारी हजर राहुन कामे करणार आहेत. या महाराजस्व अभियानाचा लाभ मेटीखेडा मंडळातील आधिवास ७ जातीचे प्रमाणपत्र १७ उत्पन्न दाखला ५३ अपाक नोंद ९ वारस नोंदणी ७/१२ ८अ,४२ निराधार २२,PM किसान १२,ॲग्रीस्टाग ६ राशन कार्ड ९८ राष्टीयत्व २ नॉन क्रिमिलीयर ८,आधार अपडेट ४२,आयुष्यमान कार्ड ४५ रहिवाशी ९ जन्म दाखला १ नमुना ८-०९ असे एकून ३८६ विविध प्रकारचे दाखले वितरित करण्यात आले मार्कडा ता.कळंब येथे महा राजस्व अभियान पार पडले कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंचा अश्विनी दिलीप पवार होते यावेळी तहसीलदार धिरज स्थूल अप्पर तहसीलदार कार्यालय चे नायब तहसीलदार अनिल राजगुरे डॉ.आशिष कांबळे,वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य अधिकारी मेटीखेडा,जीवन अमृत मेश्राम वनरक्षक मार्कडा मेटीखेडा मंडळ अधिकारी ज्ञानेश्वर गरकळ,विरेंद्र चव्हाण पत्रकार जि. एम. राजहंस तलाठी मार्कडा वैशाली थुल सचिव गट ग्रामपंचायत कोळेझरी तलाठी डी. एम. काळे,गजानन साखरकर तलाठी,पूनम सेजल तलाठी मेटीखेडा अनिल गेडाम तलाठी पालोती एम.ऐ.मेश्राम (NHV), एस. एम. इरपाते आरोग्य सेविका,नितीन बकाले (MPW) सुनीता राठोड (सुपरवायजर) लक्ष्मी चिंचाळकर(आशा)अर्चना मेश्राम(CRP)ग्रामसंघ मार्कडा विशाल अवथले,बंडू राऊत,प्रल्हाद भाऊ,बंडू ढगे,पोलीस पाटील मार्कडा, कोळेझरी पालोती,पार्डी,प्रधानबोरी, झाडकिन्ही,मेटीखेडा व परिसरातील महिला भगिनी व नागरिकांची झुंबड पाहायला मिळाली.

# परतूर एसटी आगारातर्फे श्रावण मास तीर्थयात्रा दर्शनाचे आयोजन....

दैनिक युवक आधार
परतूर-जालना (अशोक ठोके)

श्रावण महिन्यात राज्यातील काही धार्मिक स्थळांना भाविकांना भेटी देता याव्यात यासाठी परतूर एसटी आगारामार्फत तीर्थयात्रा दर्शन विशेष सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. या मध्ये परतूर ते औंढा नागनाथ , चिंतामणी गणपती हिंगोली येथे जाण्याची वेळ ग्रुप उपलब्ध झाल्यानंतर प्रत्येक सोमवारी व शनिवारी सकाळी 6 वाजता फुल प्रवासी भाडे 222 रुपये महिला व ज्येष्ठ नागरिक . परतूर ते छत्रपती संभाजी नगर- खुलताबाद घृणेश्वर - वेरूळ येथे ग्रुप उपलब्ध झाल्यानंतर प्रत्येक सोमवारी व शनिवारी सकाळी 6 वाजता फुल प्रवासी भाडे 272 रुपये महिला व ज्येष्ठ नागरिक. परतूर ते तुळजापूर अक्कलकोट दर्शन फुल प्रवासी भाडे 555 रुपये महिला व ज्येष्ठ नागरिक. यामध्ये ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. तरी सर्व भाविक, प्रवासी बंधू भगिनींनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन परतूर आगारप्रमुख श्रीमती माधुरी देशमुख मोबाईल नंबर 9172960828 व वाहतूक निरीक्षक साळवे मोबाईल नंबर 7028907776 यांनी केले आहे.



## जाहिर

हनुमान घुमरे या विद्यार्थ्यांची टि.सी.हरवली हनुमान शिवाजी घुमरे वय 18 वर्ष धंदा शिक्षण रा. तिडी पिंपळगाव ता.सेलू जि परभणी येथील रहीवाशी असुन सन 2022 या शैक्षणिक वर्षांमध्ये परभणी पब्लिक स्कूल, परभणी ता.जि परभणी इयत्ता 10 वी मध्ये शिक्षण घेऊन उत्तीर्ण झाला असून सदर शाळेकडून मिळालेली टि.सी. ची मुळप्रत ही दिनांक 28/07/2025 रोजी गुगळी धामणगाव ते सेलू प्रवासादरम्यान गहाळ झाली आहे.तसेच यासोबत पॅन कार्ड आधार कार्ड व इतरही काही कागदपत्र होती. जर कोणास आढळल्यास संपर्क साधा.
**मो. 8261076708**

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# समाजप्रिय नेतृत्व आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा

## राज्यभरातून शुभेच्छांचा वर्षाव; मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सभापती, प्रदेशाध्यक्ष यांच्यासह अनेक मान्यवरांकडून शुभेच्छा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (हरेश साठे)**

समाजहिताची भूमिका समर्थपणे निभावणारे आणि कार्यसम्राट म्हणून ओळखले जाणारे समाजप्रिय नेतृत्व आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस यंदाही सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या विशेष दिवशी आमदार प्रशांत ठाकूर यांनी वडील लोकनेते रामशेठ ठाकूर आणि






आपल्या वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! आपण पनवेल विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना सामाजिक जाणिवेचे भान ठेवत लोकसेवेची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत आहात. लोकशाही व्यवस्थेत जनतेचा प्रतिनिधी म्हणून कार्य करताना, लोकहिताला केंद्रस्थानी ठेवण्याची आपली भूमिका उल्लेखनीय आहे. आपले वडील, श्री. रामशेठ ठाकूर यांनी पनवेल परिसराच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात अत्यंत मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याचा वारसा आपण समर्थपणे पुढे नेत आहात, ही बाब निश्चितच प्रशंसनीय आहे. आपल्याला उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो आणि पुढील वाटचालीत जनतेच्या अपेक्षांना सार्थ ठरवणारे कार्य करण्याची ऊर्जा सदैव लाभो, हीच मनःपूर्वक सदिच्छा!
**मा. श्री. अजितदादा पवार - उपमुख्यमंत्री- महाराष्ट्र राज्य**

सर्वप्रथम वाढदिवसाच्या आपणास मनःपूर्वक शुभेच्छा. आपण एक जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारी मिळाल्यावर मतदारांच्या अडचणी समजून त्या तातडीने सोडवण्यास आपण नेहमीच प्राधान्य दिले आहे. कामातील चिकाटी व प्रामाणिकपणाच्या जोरावर नागरिकांच्या मनात आपण वेगळी छाप टाकली आहे. मतदारसंघाच्या विकासासाठी नवनवीन संकल्पनांच्या माध्यमातून आपण काम केले आहे. एखादे काम पूर्णत्वास नेण्यासाठीची आपली चिकाटी व जिद्द मी पाहिली आहे. मनमिळावू स्वभाव व कामाप्रती असलेली निष्ठा यामुळेच आपण जनसामान्यांच्या मनात आदराचे स्थान मिळविले आहे, ही कौतुकाची बाब आहे. आपल्या या कार्यामुळे मतदारसंघातील विकासाची गती आणखी वाढेल, असा विश्वास आहे.
आपला हा यशस्वी राजकीय प्रवास असाच निरंतर सुरु राहो, आपणास निरोगी दीर्घायुष्य लाभो या मनःपूर्वक शुभेच्छा ! – मा. श्री. एकनाथ शिंदे– उपमुख्यमंत्री– महाराष्ट्र राज्य

**प्रिय प्रशांत जी,**
**वाढदिवसानिमित्त आपले मनःपूर्वक अभिष्टचिंतन !**
पनवेल विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करत असताना आपण दाखवलेला विकासात्मक दृष्टीकोन, समाजाभिमुख उपक्रम आणि लोकसहभागाला दिलेले प्राधान्य महत्त्वपूर्ण आहे. आपल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मतदारसंघाचा चेहरा बदलताना दिसत आहे, पनवेल परिसरात शहरी तसेच ग्रामीण विकासाला नवे परिमाण मिळताना दिसत आहे. सोबतच शहराचा विकास झपाट्याने होत असताना पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपणासारख्या मोहिमेच्या माध्यमातून आपण घेतलेला पुढाकारही प्रशंसनीय आहे. सर्वसामान्यांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठीची आपली तळमळ आणि त्यासाठी आपण करत असलेला पाठपुरावा जनतेशी असलेली निष्ठा दर्शवणारा आहे. लोकप्रतिनिधींची दिनचर्या अत्यंत धावपळीची असते. मतदारसंघांची काळजी वाहत असताना आपण आपल्या आरोग्याचीही काळजी घ्याल, अशी आशा आहे. आपणास निरामयी दिर्घायुष्य लाभो व आपल्या सर्व मनोकामना पूर्ण होवो या सदिच्छेसह आपणास पुनःश्च वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.!– माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र राज्य

नमस्कार, आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा... एक कार्यकुशल आणि विकासाभिमुख लोकप्रतिनिधी म्हणून आपण पनवेल विधानसभा मतदारसंघ आणि रायगड जिल्ह्याच्या विकासासाठी उत्तम योगदान देत आहात. हे कार्य अशाच उत्तम प्रकारे यापुढेही सुरू रहावे; लोकसेवेचा आपला मार्ग उत्तरोत्तर अधिक प्रशस्त होत जावा आणि त्यासाठी सर्वशक्तिमान परमेश्वराने आपणांस आरोग्यसंपन्न, उत्साहपूर्ण, यशस्वी दीर्घायुष्य प्रदान करावे हीच आजच्या दिनी शुभकामना...– मा. श्री. राम शिंदे, सभापती– महाराष्ट्र विधान परिषद

आई शकुंतला ठाकूर यांचे आशिर्वाद घेतले. त्यानंतर पनवेलमधील मार्केट यार्ड येथे त्यांना शुभेच्छा देण्यासाठी हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी गर्दी केली.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यातील अनेक मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्यासह अनेक मंत्री, खासदार, आमदार आणि मान्यवरांनी तसेच सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय, कला, क्रीडा, प्रशासकीय, विधी, पत्रकारिता, वैद्यकीय, संगीत, नाट्य, सामाजिक संस्था, संघटना, विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी तसेच हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे अभिष्टचिंतन केले.

या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम आयोजित करण्यात आले होते. आरोग्य शिबिरे, स्वच्छता मोहिमा, शैक्षणिक मदतवाटप, महिला सक्षमीकरण कार्यक्रम आदींचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांद्वारे आमदार प्रशांत ठाकूर यांनी जनतेप्रती असलेली बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित केली. वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी पनवेल व सीकेटी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'महारोजगार मेळावा २०२५', भारतीय जनता पार्टी खिडूकपाडा, कामगार नेते प्रभुदासअण्णा भोईर व सुरेश भोईर यांच्यावतीने रुग्णसेवेसाठी मोफत रुग्णवाहिका सेवा लोकार्पण, 'जाणीव एक सामाजिक संस्था' आणि 'सखी महिला मंडळ' यांच्या संयुक्त विद्यमाने 'आमदार चषक भव्य बुद्धिबळ व कॅरम स्पर्धा', भारतीय जनता पार्टी प्रभाग १९ आणि जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्यावतीने मोफत आरोग्य शिबीर व रक्तदान शिबीर, भाजप रायगड जिल्हा सांस्कृतिक सेलच्यावतीने गदिमा आणि बाबूजींच्या अजरामर कार्याला मानवंदना असलेल्या 'ज्योतीने तेजाची आरती' संगीतमय कार्यक्रम, जागृती फाऊंडेशनच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीर, खारघरचा राजा मंडळाच्या वतीने महाराणी पैठणीची कार्यक्रम, तसेच महिलांसाठी विविध स्पर्धा आणि साडी वाटप, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल, नादब्रम्ह साधना मंडळ खारघर आणि पनवेल तालुका सांस्कृतिक सेल यांच्या संयुक्त विद्यमाने 'शास्त्रीय व सुगम संगीत सुश्राव्य मैफिल, शिवतेज मित्र मंडळ व साबाई माता महिला मंडळ खारघरच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर, भारतीय जनता पार्टी कळंबोली यांच्यावतीने आमदार प्रशांत ठाकूर यांची ग्रंथतुला तसेच सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रम, माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे यांच्यावतीने धाकटा खांदा येथील शाळेत चित्रकला स्पर्धा, भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहराच्या वतीने लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय महानगरपालिका शाळा क्रमांक १ मधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, खारघर स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे प्री इंटर स्कुल बास्केट बॉल स्पर्धा, गुड मॉर्निंग ४० प्लस आदई वलप विभाग व भाजप पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने क्रिकेट स्पर्धा, आरपीआयचे पनवेल महानगरपालिका जिल्हा क्षेत्र अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांच्यावतीने रक्तदान तसेच पॅनकार्ड व आधार कार्ड शिबीर, नवीन पनवेल येथे माजी नगरसेविका वृषाली वाघमारे यांच्यावतीने विविध कामांचे लोकार्पण, आयुष्मान भारत कार्ड वाटप आणि विद्यार्थ्यांना वह्या वाटप, भारतीय जनता युवामोर्चा प्रभाग क्रमांक १४ यांच्यावतीने स्वच्छता दूतांना रेनकोट व टिफिन वाटप, रत्नदिप स्पोर्ट्स क्लबच्यावतीने इयत्ता दहावी आणि बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव तसेच शाळेतील विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील यांच्या आयोजनातून सवलतीच्या दरात वॉटर फिल्टर, विकासकामांचे लोकार्पण, तसेच विविध मंडलात वृक्षारोपण अशी अनेक सामाजिक उपक्रम कार्यक्रमे आयोजित करत वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमात साजरा करण्यात आला.

**सामाजिक भान जपणारा वाढदिवस**

राज्याचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रेरणेतून आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून एक सामाजिक उत्सव घडवून आणला. भव्य जाहिराती, होर्डिंग-बॅनर यावर खर्च करण्याऐवजी त्यांनी कार्यकर्त्यांना सामाजिक उपक्रम राबवण्याचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत ठिकठिकाणी आरोग्य शिबिर, रोजगार मेळावे, खेळ स्पर्धा, तसेच शालेय चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. त्यामुळे वाढदिवस साजरा होण्याच्या पारंपरिक चौकटीपलीकडे जाऊन हा दिवस एक सामाजिक योगदानाचा उत्सव ठरला. जनतेच्या प्रश्नांशी जोडलेपण, समाजोपयोगी दृष्टिकोन आणि विधायक उपक्रमांची निवड हे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाचे खास वैशिष्ट्य ठरते. त्यांच्या या आगळ्यावेगळ्या वाढदिवसाने जनतेच्या मनात अधिक विश्वास निर्माण केला आहे.

# भारतीय संस्कृतीची जपणूक करणारी मॉडेल डॉ. सारिका शहा

**दैनिक युवक आधार -**
**घाटंजी प्रतिनिधि. महेश पेन्दोर**

यवतमाळ :मॉडेल म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर पाश्चात्य पेहराव आणि कमी कपड्यांमध्ये वावरणारे लोक येतात. मात्र, याच मॉडेलिंगच्या जगात भारतीय संस्कृतीची ओळख जपणाऱ्या डॉ. सारिका महेश शहा यांनी एक वेगळीच ओळख निर्माण केली आहे. यवतमाळमधील रहिवासी असलेल्या डॉ. सारिका या पेशाने पॅथॉलॉजिस्ट आहेत. त्यांनी मॉडेलिंग हा छंद म्हणून स्वीकारला आणि भारतीय संस्कृतीला धरून अनेक सौंदर्य स्पर्धांमध्ये यश मिळवले.

डॉ. सारिका शहा यांचे यश आणि सन्मान

डॉ. सारिका शहा यांनी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सौंदर्य स्पर्धांमध्ये विजेतेपद पटकावले आहे. त्यांच्या काही प्रमुख उपलब्धी खालीलप्रमाणे:

* मिसेस युनायटेड नेशन्स वर्ल्ड फायनल (२०१९): विजेत्या
* मिसेस दिवा ऑफ इंडिया इंटरनॅशनल (२०१९): विजेत्या
* मिसेस वर्ल्ड (२०१८): फर्स्ट रनर-अप
* गृहसहेली मिसेस इंडिया (२०१७): सेकंड रनर-अप
* भारत भूषण अवॉर्ड (२०२१): सन्मानित

सामाजिक कार्याची मोठी ओळख

डॉ. सारिका शहा मॉडेलिंगसोबतच सामाजिक क्षेत्रातही सक्रिय आहेत. त्यांनी अनेक संस्थांमध्ये महत्त्वपूर्ण पदे भूषवली आहेत.

* महिला सुरक्षा फाउंडेशन: महाराष्ट्र राज्य सचिव
* राष्ट्रीय नारी सशक्तिकरण: महाराष्ट्र राज्य अध्यक्ष
* हिंदू वेलफेअर फाउंडेशन: महाराष्ट्र राज्य अध्यक्ष
* जयहिंद सैनिक संस्था: राष्ट्रीय संरक्षक
* भारतीय जैन संघटना (२०२५ पासून): यवतमाळ महिला अध्यक्ष
* IMA वुमेन्स विंग यवतमाळ (२०२२): अध्यक्षा




यासोबतच, त्या ऑर्गन ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेटर म्हणून अवयवदानाविषयी जागरूकता निर्माण करण्याचे काम करतात. त्यांनी 'स्मार्ट गर्ल ट्रेनर' म्हणून आतापर्यंत ४००० हून अधिक मुलींना सक्षम केले आहे. तसेच, ३००० हून अधिक मुलींची मोफत रक्त तपासणी करून त्यांना अनिमियामुक्त केले आहे. गर्भवती महिलांसाठी 'गर्भसंस्कार' शिबिरे घेण्यासोबतच त्या रेकी ग्रँडमास्टर आणि लामा फेरा हीलर म्हणूनही कार्यरत आहेत. मॉडेलिंगच्या माध्यमातून आपल्या भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवत, सामाजिक कार्याला वाहून घेणाऱ्या डॉ. सारिका शहा यांचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी आहे.

# राज्याचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथराव शिंदे यांची माजी मंत्री तथा मा.खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांच्या निवासस्थानी सांत्वन पर भेट

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड - जेष्ठ नेते मा.खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांच्या पत्नी आणि माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकरावजी चव्हाण यांच्या भगिनी स्व.सौ.स्नेहलताताई भास्करराव पाटील खतगावकर यांचे परवा निधन झाले असता आज राजेंद्रनगर,नांदेड येथील निवासस्थानी राज्याचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथराव शिंदे यांनी सांत्वन पर भेट दिली. शिवसेना आणि शिंदे कुटुंबीय खतगावकर कुटुंबाच्या दुःखात सहभागी आहोत खतगावकर कुटुंबास या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो अशा भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर,आमदार हेमंत पाटील,आमदार बालाजीराव कल्याणकर,आमदार आनंदराव बोंढारकर,आमदार बाबुराव कोहळीकर,माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा,माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे,माजी आमदार अविनाशराव घाटे, डॉ.मीनलताई निरंजन पाटील खतगावकर, सरजितसिंग गिल,आनंदराव चव्हाण,बालाजीराव खतगावकर, रवी पाटील खतगावकर,प्रवीण पाटील चिखलीकर,दीपक पावडे,भास्कर भिलवंडे,राजू गंदीगुडे,सौ.अपर्णा नेरळकर, डॉ.अंकुश देवसरकर, साबीर चाऊस,मोहसीन खान पठाण,विवेक देशमुख,तुळजेश यादव,शंकरराव हंबर्डे,डॉ. विक्रम देशमुख,जोगिंदरसिंग खैरा,जगन्नाथ सावकार चक्रावार, संभाजीराव देशमुख,विनय गिरडे,शिवाजी पाटील जाधव,शिवाजी पाटील शिरूरकर,एन. डी.पवार,विश्वास कदम,सचिन किसवे,दिलीप सावकार कोडगिरे,अँड. बाळकृष्ण शिंदे यांच्यासह खतगावकर कुटुंबातील सर्व सदस्य उपस्थित होते.

# पीक कर्ज वितरणात दिरंगाई, आमदार विनोद अग्रवाल यांनी राष्ट्रीयकृत बँक अधिकाऱ्यांची घेतली कानउघाडणी

## ठरलेल्या वेळेआधी पीक कर्ज वितरणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे बँकांना दिले निर्देश

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड प्रतिनिधी गोंदिया जिल्हा**
**गोंदिया, ०४ ऑगस्ट**

एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार शेतकऱ्यांना समृद्ध, सक्षम आणि स्वावलंबी बनविण्यासाठी सर्व स्तरांवर प्रयत्नशील आहे, तर दुसरीकडे राष्ट्रीयकृत बँकांकडून वेळेवर कर्ज न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना पीक घेणे कठीण होत आहे. देशातील ही पहिलीच सरकार आहे, जिने शेतकऱ्यांच्या हितासाठी सहकार मंत्रालयाची स्थापना केली. पण दुर्दैव म्हणजे आजही आपला अन्नदाता यंत्रणेच्या अकार्यक्षमतेमुळे विवश आणि हतबल झाला आहे.

आज दिनांक ४ ऑगस्ट रोजी पंचायत समिती गोंदिया येथे आमदार विनोद अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली शेतकऱ्यांना पीक कर्जाच्या वाटपाचा आढावा घेण्यासाठी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या माध्यमातून एक बैठक आयोजित करण्यात आली होती.




या बैठकीत हे स्पष्ट झाले की राष्ट्रीयकृत बँकांना पीक कर्ज वाटपासाठी दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यात त्यांनी स्पष्टपणे हलगर्जीपणा दाखवला आहे.

या विषयावर आमदार विनोद अग्रवाल यांनी गोंदिया तालुक्यातील को-ऑपरेटिव्ह सोसायट्या, ग्रामीण बँक आणि राष्ट्रीयकृत बँकांच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांच्या उद्दिष्टांची माहिती घेतली.

यामध्ये असे निदर्शनास आले की ग्रामीण बँक वगळता इतर राष्ट्रीयकृत बँकांनी दिलेल्या उद्दिष्टापैकी केवळ १०% कर्जच शेतकऱ्यांना वितरित केले आहे. यावर आमदार विनोद अग्रवाल यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले आणि ठरलेल्या वेळेआधी उद्दिष्ट पूर्ण करण्याचे कठोर निर्देश दिले.यासोबतच आमदार विनोद अग्रवाल यांनी सांगितले की, सेवा सहकारी सोसायट्यांचे जे शेअर्स बँकेत ठेवले जात होते, ते आता सोसायट्यांमध्येच ठेवले जाणार आहेत, अशी व्यवस्था करण्यात येणार आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांशी चर्चा झाली असून, ते लवकरच होणाऱ्या पहिल्या सर्वसाधारण सभेत हा प्रस्ताव मंजूर करतील. सोसायटी आणि बँक यांच्या नोंदींमध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठीसुद्धा बँकेला सूचना करण्यात आल्या असून, जीडीसीसी बँक यावर सकारात्मक पावले उचलेल. त्याचबरोबर नवीन सभासदांचे प्रस्ताव मंजूर करण्याचे निर्देशही अधिकाऱ्यांना देण्यात आले. या आढावा बैठकीत आमदार विनोद अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समितीचे सभापती मुनेश रहांगडाले, सहकारी संस्थांचे सहाय्यक निबंधक श्री. रोकडे, पंस खंड विकास अधिकारी श्री. पिंगळे, एपीएमसीचे संचालक श्री. ठाकूर, पंचायत समिती सदस्य श्री. शंकर टेंभरे, ववीर इनायतजी इत्यादी उपस्थित होते.

# अंभोरा प्राथमिक शाळेत हायटेक शौचालयाचे उद्घाटन : युवानेते जयदत्त भैय्या धस यांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**बाळासाहेब रकटाटे प्रतिनिधी | आष्टी**

अंभोरा (ता. आष्टी) – जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, अंभोरा येथे दिनांक २८ जुलै रोजी आधुनिक व सुविधा-संपन्न शौचालय इमारतीचे उद्घाटन युवानेते मा. जयदत्त (भैय्या) सुरेश धस यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.

ग्रामपंचायत अंभोरा निधीतून साकारलेले हे शौचालय शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी स्वच्छता आणि आरोग्याच्या दृष्टिकोनातून एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे. शौचालयाच्या बांधकामासाठी सरपंच सागर (शेठ) आमले आणि ग्रामपंचायत सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

उद्घाटनप्रसंगी मा. जयदत्त भैय्या धस म्हणाले, “ग्रामीण भागातील शाळांमध्ये अशी आधुनिक आणि स्वच्छतागृह सुविधा असणे ही काळाची गरज आहे. अंभोरा शाळेतील हे शौचालय मी पाहिलेल्या जिल्हा परिषद शाळांपैकी सर्वात उत्कृष्ट आणि दर्जेदार आहे.”

या प्रसंगी गटशिक्षणाधिकारी सीमा काळे, केंद्रप्रमुख जावेद पठाण, जिल्हा परिषद सदस्य सुखदेव (दादा) खाकाळ, पंचायत समिती सदस्य सुभाष खाकाळ, उपसरपंच विश्वास खाकाळ, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजेश आटोळे, उपाध्यक्ष अशोक आमले, ग्रामविकास अधिकारी नरवडे साहेब आदी मान्यवर उपस्थित




होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक अशोक शिंदे सर, सर्व शिक्षकवृंद, ग्रामस्थ व पालक वर्ग यांनी सहकार्य केले.

शाळेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे व सहकार्य करणाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

# सामाजिक कार्य हीच खरी सेवा – युवानेते महादेव डोके यांच्याशी विशेष मुलाखत

आजच्या धावपळीच्या आणि मतलबी जगात माणुसकी झपाट्याने हरवत चालली आहे. नाती कमकुवत झाली आहेत आणि सामाजिक बांधिलकी विसरली जात आहे. परंतु या पार्श्वभूमीवर समाजासाठी झटणारी, समाजात परिवर्तन घडवण्याची तळमळ बाळगणारी काही मोजकीच माणसे आहेत. अशीच एक प्रेरणादायी व्यक्ती म्हणजे दौलवडगाव गटातील युवा नेतृत्व महादेव डोके.

प्रश्न 1: आपला जन्म व बालपण कुठे आणि कसं झालं?

उत्तर: माझा जन्म २३ जुलै १९९० रोजी सालेवडगाव या गावात झाला. अत्यंत साध्या कुटुंबात बालपण गेले. लहानपणापासूनच समाजातील प्रश्न, गरजा आणि लोकांच्या दुःखद क्षणांशी मी जोडला गेलो. गावातल्या एकोप्याच्या वातावरणाचा माझ्या मनावर खोल प्रभाव पडला.

प्रश्न 2: आपलं शालेय आणि उच्च शिक्षण कसं झालं?

उत्तर:

इयत्ता १ ली ते ४ थीपर्यंतचं शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सालेवडगाव येथे घेतलं.

५ वी ते ७ वी संत कैकाडी महाराज विद्यालय, वाघळूज येथे.

माध्यमिक शिक्षण भैरवनाथ विद्यालय, सालेवडगाव येथे पूर्ण केलं.

त्यानंतर उच्च प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण जनता महाविद्यालय, धानोरा येथे.

त्यानंतर कृषीशास्त्रात B.SC. AGRICULTURE पदवी घेतली, ज्यामुळे ग्रामीण व शेतीविषयक प्रश्नांची जाणीव अधिक तीव्र झाली.

प्रश्न 3: आपण सामाजिक कार्यात नेमकं कसं सहभागी झाला?

उत्तर: शालेय जीवनापासूनच सामाजिक कामाची आवड होती. कोणाचंही लग्न असो, अपघात, दुखवटा, कुणाला मदत लागली तर मी तिथं पोहोचायचो. ही सवयच पुढे माझ्या आयुष्याचा अविभाज्य भाग झाली आणि आज हेच माझं ध्येय बनलं.

प्रश्न 4: आजवर आपण कोणकोणती सामाजिक कामं केली आहेत?

उत्तर:

आंबेवाडी (कारखेल, सालेवडगाव) येथे मंदिरासमोर पेव्हिंग ब्लॉकसाठी शासन




दरबारी पाठपुरावा करून मंजुरी मिळवली आणि काम पूर्ण केलं.

सालेवडगाव व परिसरातील विहिरी आणि तलाव शासनाच्या योजना वापरून मंजूर करून घेतले व प्रत्यक्ष काम पूर्णत्वास नेले.

वस्ती रस्त्यांची कामे, ग्रामविकास योजनांमध्ये सक्रिय सहभाग.

दौलावडगाव, आंबेवाडी, कारखेल येथील ४ कुटुंबांना आर्थिक मदत करून त्यांच्या नावे F.D. करून आर्थिक स्थैर्य निर्माण केलं.

मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मदत मिळवून दिली.

वाढदिवसानिमित्त अरणविहिरा शाळेला प्रिंटर भेट देऊन शैक्षणिक मदत.

रक्तदान शिबिरं, वृक्षारोपण, ग्रामसभा जनजागृती यासारख्या उपक्रमांमध्ये सहभाग. अशी एक ना अनेक सामाजिक कामे केली आहे

प्रश्न 5: कोरोना काळात आपण नेमकं काय सेवा कार्य केलं?

उत्तर:

कोरोना काळात सालेवडगाव येथे कोविड सेंटर उभारण्याचे महत्त्वाचे कार्य केलं.

रुग्णांना मोफत उपचार, मास्क व सॅनिटायझर वाटप, अन्नधान्य वितरण, ज्येष्ठ नागरिकांसाठी औषधांची व्यवस्था, कोविड रुग्णांसाठी जनजागृती – हे सर्व मी स्वतः पुढाकार घेऊन केलं. लोकांचे मनोबल उंचावण्यासाठी मी त्या काळात अविरत कार्यरत होतो.

प्रश्न 6: सध्या समाजात काय बदल व्हायला हवेत असं तुम्हाला वाटतं?

उत्तर:

माणुसकी, आपुलकी, आणि नैतिक मूल्यं यांची पुन्हा जाणीव समाजात निर्माण होणं आवश्यक आहे. प्रत्येकाने "मी" ऐवजी "आपण" या दृष्टिकोनाने विचार केल्यास समाज प्रगती करेल. स्वतःचा फायदा पाहण्याऐवजी एकमेकांना मदतीचा हात देणं गरजेचं आहे.

प्रश्न 7: आपल्या दृष्टीने खरा समाजकार्य म्हणजे काय?

उत्तर:

खरं समाजकार्य म्हणजे कुणी पाहतंय की नाही हे न बघता, आपल्या मनापासून दुसऱ्यासाठी काहीतरी करणं. विहिरी असोत, तलाव असोत, रुग्णसेवा असो, वा एखाद्या विद्यार्थ्याला मदत – ही सगळी कामं मी समाजाचं देणं समजून करतो. हेच मला समाधान देतं.

प्रश्न 8: आपण समाजाला काय संदेश द्याल?

उत्तर:

"स्वतःपुरतं न जगता समाजासाठी जगायला शिका."

आपण जे काही मिळवलं आहे त्याचा उपयोग दुसऱ्यांसाठी व्हावा. प्रत्येकाने एक छोटं चांगलं काम केलं, तर संपूर्ण गाव, समाज आणि देश बदलू शकतो.

प्रश्न 9: आपल्या आगामी योजनांबद्दल सांगा.

उत्तर:

गावागावातील तरुणांना सामाजिक कार्यात सहभागी करून त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित करणं.

रोजगार निर्मितीसाठी नव्या योजना गावात आणणं.

पर्यावरण रक्षणासाठी वृक्षारोपण, जलसंवर्धन उपक्रम.

ग्रामीण भागात शिक्षण व आरोग्य सुधारण्यासाठी उपक्रम राबवणं.

शासनाच्या योजनांचा खऱ्या गरजूंना लाभ मिळवून देण्यासाठी प्रभावी पाठपुरावा.

महादेव डोके यांचं जीवन हे समाजासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्याचं ज्वलंत उदाहरण आहे. त्यांच्या कार्यातून तरुणांनी केवळ प्रेरणा नाही, तर दिशा घ्यावी, असा संदेश त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून मिळतो.

**मुलाखतकार -*पत्रकार बाळासाहेब रकटाटे***

## आवरे भोलेनाथ शिव मंदिरात भक्तीचा गजर.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर उरण रायगड**

श्रावण महिना म्हणजे भक्तीचा, श्रद्धेचा, आणि शिवभक्तीने भरलेला एक पवित्र काळ! श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवार हा शिवभक्तांसाठी अत्यंत महत्वाचा असतो. यालाच श्रावणी सोमवार म्हणतात. या दिवशी

शिवमंदिरांमध्ये रांगा लागतात, भक्तगण जलाभिषेक, दुग्धाभिषेक करतात, उपवास करतात आणि "ॐ नमः शिवाय" चा जप करीत, आपल्या श्रद्धेची ओळख देतात. संहार आणि सृष्टी दोन्हीचा समतोल राखणारे.ते आहेत त्यागाचे मूर्तिमंत उदाहरण –विष पिऊनही संपूर्ण सृष्टीचं रक्षण करणारे शिवशंकर.असेच रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यामध्ये आवरे गावात प्रसिद्ध शिवशंकराचे ऐतिहासिक परंपरेचा वारसा लाभलेले मंदिर आहे. या गावात महाशिवरात्र तर मोठ्या उत्साहाने साजरी होतेच त्याचबरोबर श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवार ही शंकराची पूजा मोठ्या उत्साहाने केली जाते.

श्रावणातील दुसरा सोमवार हा आवरे गावातील श्री ठाणकेश्वर गणेश मित्र मंडळ आवरे या मंडळास आरतीचा मान मिळाला सकाळची प्रात काकड आरती ही आपल्या सुश्राव्य आवाजात नरेश गावंड , साक्षी गावंड ,महेश गावंड, नारायण गावंड व साथ संगत पखवाज वादक सोहम म्हात्रे व मृणाल म्हात्रे यांच्या साथीने अभंग ,नामस्मरण शिवस्तुती आणि मंदिराची श्री आरती होत असते. पंचक्रोशीतील शिवभक्त हा मोठ्या श्रद्धेने आणि मोठ्या उत्साहाने या शिवमंदिरात येत असतो. श्रावण महिन्यातील दुसऱ्या सोमवारी सामाजिक कार्यकर्ते राजू मुंबईकर, पत्रकार जीवन केणी, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार रणिता ठाकूर, सुनील वर्तक तसेच पंचक्रोशीतील आदी मान्यवर ही उपस्थित होते. आलेल्या मान्यवरांचे श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी आलेल्या भक्तगणांसाठी अन्नदान आवरे गावचे शिवभक्त कौशिक ठाकूर सर यांनी केले. अशा प्रकारे दुसऱ्या श्रावणी सोमवारी आवरे भोलानाथ मंदिर शिवनामाच्या गजराने दुमदुमला.




## रोशनगाव जि.प.शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी गंगाप्रसाद गायकवाड तर उपाध्यक्षपदी राष्ट्रपाल बनसोडे यांची बिनविरोध निवड.

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी : गिरमाजी सुर्यकार**

धर्माबाद तालुक्यातील रोशनगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व्यवस्थापन समितीचे कार्यकाळ संपल्याने नवीन व्यवस्थापन समिती पुनर्गठन करण्यात आली. पालक सभा आयोजित करण्यात आले या सभेचे अध्यक्षस्थानी माजी समिती अध्यक्ष आशाताई मेडेवार प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच प्रतिनिधी शिवराज भडंगे हे होते. अध्यक्षपदी गंगाप्रसाद जमनाजी गायकवाड व उपाध्यक्षपदी राष्ट्रपाल बाबाराव बनसोडे यांची व तसेच ग्रामपंचायत सदस्यातून प्रतिनिधी म्हणून नागनाथ गंगाधर माळगे व शिक्षण प्रेमी म्हणून माधव गंगाधरराव शिवशेट्टे यांची एकमताने निवड करण्यात आली





तर इतर समिती सदस्य पुढीलप्रमाणे नारायण शंकरराव शिवशटटे, रामेश्वर नारायण माळगे, आडेलु दिगंबर मेडेवार, तर माता पालक म्हणून, सौ प्रज्ञा दीपक देवके, सौ राणी मारुती डोंगरे, सौ आशाताई हनुमंत मेडेवार, सौ संगीता मारोती जगजेकर,श्रीमती भाग्यशिला राहुल वाघमारे, विद्यार्थी प्रतिनिधी चिरंजीव आयुष्य राष्ट्रपाल बनसोडे, कु. सुजाता साईनाथ दिकोंडवार, शिक्षक प्रतिनिधी सय्यद जे. आय. सचिव तथा मुख्याध्यापक देशपांडे आर. एस.यांची निवड करण्यात आली. मावळत्या अध्यक्षांनी आपली सूत्रे नूतन अध्यक्षांकडे सोपवली. याप्रसंगी माधवराव नारायण माळगे, शिवराज पाटील भडंगे, भाऊराव देवके, शिवाजी जगजेकर, सुनंदाबाई देवके, विद्यार्थी, पालक, शिक्षक,आदी उपस्थित होते. मावळत्या कार्यकारणीचे व उपस्थित सर्वांचे सचिव देशपांडे सरांनी आभार मानले व नूतन कार्यकारणी कडून सहकार्याची अपेक्षा व्यक्त करून बैठकीची सांगता केली. नूतन अध्यक्ष व उपाध्यक्ष,सदस्य यांचे सरपंच प्रतिनिधी शिवराज पाटील भडंगे, यांनी अभिनंदन केले.

पालक सभेमध्ये स्पष्ट सांगितले की, ग्रामपंचायत रोशनगाव वतीने जिल्हा परिषद शाळेसाठी आवश्यक ती प्रत्येक मदत केली जाईल. त्यांनी शाळेच्या भौतिक विकास, स्वच्छता ,पाणी, संरक्षक भिंत,वीज ,मैदानाचा विकास यासारख्या बाबतीत ग्रामपंचायतकडून सकारात्मक सहकार्याचे आश्वासन दिले. त्यांनी शाळा व्यवस्थापन समिती पालक शिक्षक आणि ग्रामपंचायत यांचा सुसंवाद राखून काम करण्यावर भर दिला जाईल.
शाळा विकासासाठी एकत्र येऊया
शाळा व्यवस्थापन समिती विद्यार्थ्यांच्या हितासाठी आहे .
सरपंच प्रतिनिधी शिवराज पाटील भंडगे

विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शिक्षण व डिजिटल सुविधा वाढवणे शिक्षक पालक संवाद अधिक प्रभावी करणे शाळेच्या सर्वांगीण शैक्षणिक व भौतिक विकास विद्यार्थ्यांसाठी क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात संधी उपलब्ध करून देणे , स्वच्छ, सुरक्षित, आधुनिक शाळा परिसर उभारणार
**गंगाप्रसाद गायकवाड**
**शाळा समिती व्यवस्थापन, अध्यक्ष**

## वणी वाहतूक पोलीस ठाण्यातील पोलिस जमादार गोपाल हेपट यांच्याविरुद्ध गंभीर आरोप;
### पदाचा गैरवापर करून अवैध संपत्ती गोळा केल्याचा व्हिसल ब्लोअरचा रजनीकांत बोरेलेचा आरोप

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

वणी:– येथे कार्यरत पोलीस जमादार गोपाल हेपट यांनी आपल्या पदाचा व अधिकाराचा गैरवापर करून बेकायदेशीर संपत्ती गोळा केल्याचा गंभीर आरोप व्हिसल ब्लोअर, सामाजिक कार्यकर्ते आणि जिंदल पुरस्कार विजेते रजनीकांत डालूरामजी बोरेले यांनी केला आहे. त्यांनी पोलीस महासंचालक,विशेष पोलीस महानिरीक्षक आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांना सादर केलेल्या तक्रारीत हे गंभीर आरोप केले आहेत.



तक्रारीत रजनीकांत डालूरामजी बोरेले यांनी नमूद केले आहे की, गोपाल हेपट हे मागील १७ वर्षांपासून वणी येथेच कार्यरत असून त्यांनी त्यांच्या कार्यकाळात बेकायदेशीर मार्गांनी भुखंड, सदनिका, प्रशस्त घर त्यातील महागाळे फर्नीचर,साहित्य दुचाकी-चारचाकी वाहने, सोन्याचे दागिने,मोठ्या प्रमाणात बँक शिल्लक आणि इतर मौल्यवान वस्तूंची अवैध संपत्ती जमवली आहे.एवढेच नव्हे,तर वाहतूक खाते आणि महसुली वसुलीच्या ठिकाणी असलेल्या अधिकाराचा वापर करून त्यांनी विविध प्रकरणांतून हप्ते वसूल केल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

रजनीकांत बोरेले यांनी मागणी केली आहे की, गोपाल हेपट यांच्या संपत्तीचा आणि त्यांच्या मासिक वेतनाचा आयकर तुलनात्मक विवरणआणि ख़र्चा हिसेब जावून शिल्क भांडवल,चल - अचल संपत्ती चा सखोल तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,आयकर विभाग मार्फत करण्यात यावा. तसेच त्यांनी दरवर्षी आयकर विवरणात दिलेली माहिती आणि प्रत्यक्ष मिळकत यामधील विसंगती तपासली जावी. त्यांनी हे देखील अधोरेखित केले आहे की, एका पोलीस कर्मचाऱ्याला १०-१७ वर्षे एकाच ठिकाणी ठेवणे नियमानुसार अयोग्य असून,यामध्ये उच्च अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद आहे.या वरुण असे दिसून येते की पोलीस महासंचालक मुंबाई आणि अमरावती चे विशेष पोलीस महानिरीक्षक हे गैर कायदेशिर बाबीनां अभय देवून गोपाल हेपट या पोलीस जमादार यांच्या भ्रष्टाचाराला खतपाणी घालीत असून गोपाल हेपट यांना पाटीशी घालीत असल्याचे आरोप शुद्धा रजनीकांत बोरेले यांनी केला आहे. पोलीस खाता शिस्त बद्ध असल्याचे उदो- उदो करणाऱ्या पोलीस विभाग यांना अनेक वर्षा पासून वणी पोलीस विभागातच गोपाल हेपट आहे हे कसे दिसून आले नाही पोलीस प्रशासन गंधारीची भूमिका अदा करीत आहे काय ? असा सवाल रजनीकांत बोरेले यांनी उभा केला आहे. कोन - कोणत्या पोलीस निरीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी, व पोलीस अधिक्षक, यांच्या कार्यकाळ मध्ये कर्त्यव्यात कसूर करुण नियंमानां तिलांजली देण्यात आली त्यांचा विरुद्ध देखील कार्यवाही करण्यात यावी.या पूर्वीचे पोलीस अधीक्षक कुमार चिता यांच्याकडे या संदर्भात कही लोकांनी देखील तक्रार दाखल केली होती. मात्र, त्या तक्रार वर कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे आता रजनीकांत बोरेले यांनी सखोल व गंभीर प्रकारची तक्रार वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे दिली आहे. त्यांनी अशीही मागणी केली आहे की, गोपाल हेपट यांच्या संपत्तीचा सखोल तपास करून फौजदारी कार्यवाही व्हावी, त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात यावे आणि त्यांनी गोळा केलेली संपत्ती शासकीय तिजोरीत जमा करण्यात यावी.या तक्रारीवर लवकरात लवकर कार्यवाही होणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे.हे विशेष

## आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघ इतिहास मंचाच्या प्रदेश संपर्क प्रमुख पदी लक्ष्मीकांत राजे शिर्के यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**अहिल्यानगर (प्रतिनिधि) :**

भारतासह जागतिक स्तरावर मराठा हिताच्या दृष्टिने शिव-शंभुकार्य करणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघ इतिहास मंचाच्या महाराष्ट्र राज्य "प्रदेश संपर्क प्रमुख" पदी पेडगाव किल्ले धर्मवीरगड येथील शंभुपत्नी महाराणी येसुबाईंचे तथा स्वराज्यनिष्ठ श्रीमंत गणोजीराजे पिलाजीराव राजे शिर्के यांचे वंशज व इतिहास अभ्यासक श्रीमंत लक्ष्मीकांत गणपतराव राजे शिर्के यांची नुकतीच निवड करण्यात आली असून तसे नियुक्तीपत्र संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी राजेशिर्के यांना दिले आहे. श्री. लक्ष्मीकांत राजे शिर्के हे गेल्या ३० वर्षापासून गडदुर्ग संवर्धन कार्यासह दुर्लक्षित वास्तव इतिहास प्रकाशात आणणे, चुकीच्या इतिहासाचे आक्षेप खंडन करणे, मराठ्यांच्या तेजस्वी इतिहासाचा प्रचार प्रसार करणे, विविध सामाजिक, शैक्षणिक, प्रबोधनात्मक कार्यक्रम घेणे, युगपुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी, स्मृति दिन, स्मरण दिन आयोजित करणे तसेच शंभुसेना संघटनेच्या माध्यमातून अनेक सामाजिक कार्य केले आहे. अशा विविध आदी कार्याची दाखल घेऊन संघटनेने त्यांची एकमताने सार्थ निवड केली आहे. तसेच वंशज लक्ष्मीकांत राजे शिर्के यांनी नुकतेच इतिहासातील दुर्लक्षित व्यक्तिमत्व शिवस्नुषा, शंभुपत्नी महाराणी येसुबाईंच्या (राजमाता राजाऊ साहेबांच्या) जयंती व पुण्यतिथी तारखांचा



शोध घेऊन २७ जुलै रोजी राज्यभरात प्रथम जयंती उत्सव सुरू करून ऐतिहासिक मोलाचे कार्य केल्याने राजेशिर्के यांची आ.स्वा.मराठा महासंघाच्या इतिहास आघाडीच्या महाराष्ट्र राज्य "प्रदेश संपर्क प्रमुख " पदी निवड केली असल्याचे आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघाचे संस्थापक डॉ. कृषीराज टकले, राष्ट्रीय अध्यक्ष व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी सांगितले. नियुक्ती नंतर बोलताना राजेशिर्के म्हणाले की, आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघ हा ऐतिहासिक वारसा जोपासणारी संघटना असून, राजमाता जिजाऊ साहेब, छत्रपती शिवराय, छत्रपती शंभुराजे व महाराणी येसुबाई (राजमाता राजाऊ) यांच्या तेजस्वी इतिहासाची तरुणांना जाणीव करुन देण्यासाठी संघटना कायम प्रयत्न करत आहे. तसेच मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी ही संघटना आवाज उठवत आहे. याकार्याला आणखी बळ देता यावं म्हणून आ.स्वा.मराठा महासंघ व इतिहास आघाडीच्या माध्यमातून मराठा समाजाचे संघटन वाढविण्यासाठी, मराठ्यांच्या इतिहासाचा जगभर जागर करणे, छत्रपती शिवरायांचे नितिशास्त्राचे युवकांना प्रबोधन करणे, ऐतिहासिक वास्तुंची माहिती देणे, गडकिल्ले संवर्धन आदी सर्व बाबींवर तरुणांमध्ये जनजागृती करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे राजेशिर्के यांनी सांगितले. लक्ष्मीकांत राजे शिर्के हे सध्या अनेक सामाजिक संस्थावर महत्वाच्या पदावर कार्यरत आहेत. नियुक्ती झाल्याबद्दल संघटनेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष एम के बी एन आर सागर, आंतरराष्ट्रीय कार्याध्यक्ष रवी प्रताप पटेल, आंतरराष्ट्रीय सचिव चैतन्य रावल, आंतरराष्ट्रीय उपाध्यक्ष हेमंत सरकार, आंतरराष्ट्रीय इतिहास आघाडी आंतरराष्ट्रीय अध्यक्ष व्याख्याते रवींद्र जगदाळे, आंतरराष्ट्रीय कार्याध्यक्ष अमरसिंह जाधवराव, आंतरराष्ट्रीय सचिव उज्वल सिंह गायकवाड, आंतरराष्ट्रीय उपाध्यक्ष इंद्रजीत घोरपडे,राष्ट्रीय कार्याध्यक्ष निलेश धुमाळ पाटील, महिला आघाडी आंतरराष्ट्रीय अध्यक्ष किरण शेखावत, महिला आघाडी भारत राष्ट्रीय अध्यक्ष कोकीळ पवार, राष्ट्रीय उपाध्यक्ष महिला आघाडी शिवशंभू प्रिया जांभळे, इतिहास आघाडी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष महेंद्र निंबाळकर, राष्ट्रीय उपाध्यक्ष दिनेश भैय्या कुर्मी,महाराष्ट्र राज्य निरीक्षक व अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष भानुदास वाबळे पाटील आदिंनी स्वागत केले आहे.